। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २१९ वा । बुधवार दिनांक १२ नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### पर्समधील रोखरक्कम व महत्वाच्या कागदपत्राची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुनयना हरिष निंबाळकर, वय ४६ वर्षे, रा. पुणे, सिंहगड रोड, माणिक बाग, अमृता नगर कुदळे पाटील हेरीटेज पुणे डी टी प्लट नं ३ या दि.१०.११.२०२५ रोजी तुळजापूर बस स्थानक तुळजापूर येथे बसमधून उतरत असताना प्रेमिका, संजना यांनी गर्दीचा फायदा घेवून सुनयना निंबाळकर यांचे पर्स मधील रोख रक्कम ९,५०० व महत्वाचे कागदपत्र चोरुन घेवून जात असताना मिळून आल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सुनयना निंबाळकर यांनी दि.१०.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत आरती रा.कल्याणनगर पारधी पिडी, भुम ता. भुम जि. धाराशिव या दि.१०.११.२०२५ रोजी भुम बसस्थानकाच्या समोरील बाजूस भुम येथे अंदाजे ३,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर कविता रा. कल्याणनगर पारधी पिडी, भुम ता.भुम जि. धाराशिव या दि.१०.११.२०२५ रोजी भुम बसस्थानकाच्या समोरील बाजूस भुम येथे अंदाजे १,००० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत खंडु रा. बेंबळी ता. जि. धाराशिव हे दि.१०.११.२०२५ रोजी बेंबळी ते चिखली जाणारे कारखान्या जवळ हॉटेल मातोश्री मध्ये बेंबळी शिवारात अंदाजे १,२०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १५ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

परंडा पोलीस ठाणे अंतर्गत मारुती रा. सोमवार गल्ली परंडा ता.परंडा जि. धाराशिव हे दि.१०.११.२०२५ रोजी कुर्डुवाडी चौकातील महाराजा हॉटेलच्या पत्राच्या शेडच्या आडोशाला अंदाजे ५,००० किंमतीची ५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे. या सर्व प्रकरणाची पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## दिव्यांग बांधवांना विविध योजनांचा लाभ

### शासकीय इमारतींमध्ये दिव्यांगांसाठी रॅम्प सुविधा उभारा -जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार



धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांसाठी विविध योजनांचा लाभ देण्यासोबतच सर्व शासकीय इमारतींमध्ये दिव्यांगांसाठी आवश्यक रॅम्प सुविधा उभारण्यात याव्यात,अशा सूचना जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी दिल्या.

जिल्हा व्यवस्थापन मंडळ व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रांतर्गत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी तसेच मतिमंद व बहुविकलांग राष्ट्रीय विश्वस्त कायदा १९९९ आणि दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आज ११ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या जिल्हा स्थानिकस्तर समितीच्या आढावा बैठकीत श्री.पुजार बोलत होते.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी देवदत्त गिरी,जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्री.बांगर,जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर,दिव्यांग बांधवांचे प्रतिनिधी मयूर काकडे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप कार्यकारी अभियंता व्ही.आर.सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

दिव्यांग हक्क अधिनियम-२०१६ च्या अंमलबजावणीअंतर्गत कायदेशीर पालकत्वासाठी आलेल्या अर्जांवर चर्चा करण्यात आली.जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र सुरू करण्याकरिता जागा उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा,पुढील तीन महिन्यांच्या कामकाजाचे नियोजन,दिव्यांगांचे सर्वेक्षण,तसेच दिव्यांग वित्त विकास महामंडळाकडून विनाअट कर्जमंजुरी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बँकांमार्फत दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या बीजभांडवल योजना व इतर योजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच पाच टक्के दिव्यांग निधीचा खर्च,संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत प्रलंबित दिव्यांग प्रस्ताव,दिव्यांगांना स्वतंत्र घरकूल योजनेचा तात्काळ लाभ मिळवून देणे,२०० स्क्वेअर फुट जागा शासन निर्णयानुसार उपलब्ध करणे,अंत्योदय रेशन कार्ड वाटप,आणि दिव्यांगांना वैश्विक ओळखपत्र देणे या बाबीवरही बैठकीत चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी श्री.पूजार यांनी सर्व संबंधित विभागांनी दिव्यांगांच्या हक्कांसाठी तत्परतेने काम करून योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा,तसेच समाजाच्या मुख्य प्रवाहात दिव्यांगांचा सहभाग वाढावा,यावर विशेष भर दिला.

## वाशी परिसरात रब्बीची मशागत सुरू, खरीप अतिवृष्टीत गेले, आता रब्बीवर मदार

वाशी(प्रतिनिधी)- रब्बी पेरणी केलेल्या पिकाचा उत्पन्न खर्च कमी करण्यासाठी शेतकरी अधिक कष्ट करत असल्याची चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. यावर्षी खरिपाचे उत्पन्न घेताना सुरुवातीला चांगला पाऊस असल्याने शेतकऱ्यांनी मेहनत घेतली. मशागत खर्च करून भरघोस उत्पन्नाची आशा धरली होती. मात्र सोयाबीन चांगले आले होते. मात्र अतिवृष्टीने तालुक्यातील ४३ हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावरील पिके पाण्यात गेली. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेली अतिवृष्टी आणि सततचा पाऊस यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न बुडाले. शासन दरबारातून मदत जाहीर झाली. काही शेतकऱ्यांना मिळाली. काही शेतकरी अद्याप मदतीपासून वंचित आहेत. सरकारने जाहीर केलेली ८,५०० रुपये हेक्टरची मदत शेतकऱ्याचा झालेला खर्चही निघणारी नाही. त्यात नियम अटी भरपूर यामुळे सरकारच्या नियमानुसार, ८५०० रुपये प्रतिहेक्टर ही मदत शेतकऱ्यांना मिळणे चालू आहे. निसर्ग लहरी झाला आहे. आणखीन काही घडले तर पुन्हा उभारणी शक्य नाही. यामुळे येणाऱ्या उत्पन्नाच्या खर्चात तरी कपात होईल दोन मिळणाऱ्या दोन पैशाच्या उत्पन्नाने खरिपाची कसर भरून निघणार नाही. पण दोन पैसे अधिक राहतील हाच विचार करून कष्टाला प्राधान्य देताना शेतकरी दिसत आहे.

खरिपाला केलेला खर्चही मदतीतून निघेना काही शेतकऱ्यांना मदत मिळालेली आहे. मात्र ही मिळालेली मदत शेतात कुजून गेलेले सोयाबीन आणि वाढलेले गवत काढणी, फुटलेले बांध या मशागतीसाठीही पुरेशी नाही. तर रब्बीच्या पेरणीसाठी जाहीर केलेली १० हजार रुपये प्रतिहेक्टर मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नाही. ज्या शेतकऱ्यांच्या शेतातील चिखल कमी झाला आहे. त्यांनी पुन्हा कंबर कसून रब्बीची पेरणी केली आहे. डवरणी व इतर बैलाने करावयाची कामे करण्यासाठी शेतकऱ्याजवळ छदामही राहिलेला नसल्याने स्वतः हाताने मशागत करून खर्च वाचवण्याची धडपड करत आहे. खरिपाला केलेला खर्च निघाला नाही.

## शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या धाराशिव जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती



धाराशिव (प्रतिनिधी)- शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव सामाजिक संघटना म्हणून गेली बावीस वर्ष धाराशिव मध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर अशी एक संघटना म्हणून काम करत आहे. याच अनुषंगाने सामाजिक क्षेत्राचे काम वाढवण्याच्या दृष्टीने समितीचा प्रसार आणि प्रचार करण्याच्या दृष्टीने धाराशिव जिल्ह्यातील सर्व आठही तालुक्यांमध्ये समितीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची नेमणूक धाराशिव शहरातील श्री गणेश मंगल कार्यालय येथे करण्यात आली.

उमरगा शहराध्यक्ष-श्री किशोर माडजे आणि उमरगा तालुकाध्यक्ष- श्री महेश फंड, लोहारा शहराध्यक्ष-श्री मंगेश गोरे आणि लोहारा तालुका अध्यक्ष श्री हरिदास रवळे, तुळजापूर शहराध्यक्ष- श्री प्रतीक अंभोरे आणि तुळजापूर तालुका अध्यक्ष- अतिश मिसाळ, कळंब शहराध्यक्ष- श्री ऋषिकेश काळे आणि कळंब तालुकाध्यक्ष- श्री एडवोकेट रणधीर देशमुख, वाशी शहराध्यक्ष- श्री विशाल कवडे आणि वाशी तालुकाध्यक्ष- श्री अंकुश मोरे, भूम शहराध्यक्ष- श्री अर्जुन जाधव आणि भूम तालुका अध्यक्ष- श्री प्रशांत शेळके, परंडा शहराध्यक्ष- श्री राहुल आगरकर आणि परंडा तालुकाध्यक्ष- श्री सुरेश घाडगे, धाराशिव शहराध्यक्ष श्री संतोष घोरपडे आणि धाराशिव तालुकाध्यक्ष श्री बबलू भोईटे,शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीमध्ये एकमताने वरील निवडी करण्यात आल्या. शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव चे मार्गदर्शक श्री शशिकांत खुणे श्री गुंडोपंत जोशी श्री धर्मराज सूर्यवंशी एडवोकेट संजय शिंदे श्री अमोल पवार श्री हरिचंद्र आगळे श्री सुनील मिसाळ श्री दत्ता साळुंके श्री हनुमंत तांबे श्री धनंजय साळुंके श्री अच्युत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली वरील सर्व तालुकाध्यक्ष व शहराध्यक्षांच्या नियुक्ती देण्याचा कार्यक्रम पार पडला यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवचे सर्व आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## युवकांच्या सुप्त प्रतिभेला वाव देण्यासाठी जिल्हास्तरीय युवा महोत्सव सहभागी होण्याचे आवाहन

धाराशिव,दि.११ नोव्हेंबर (जिमाका) युवकांचा सर्वांगीण विकास व्हावा, संस्कृती व परंपरेचे जतन व्हावे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ व्हावी,या उद्देशाने शासनामार्फत दरवर्षी जिल्हा,विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवांचे आयोजन करण्यात येते.

याच अनुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,धाराशिवतर्फे जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५ चे आयोजन २० व २१ नोव्हेंबर २०२५ रोजी पुष्पक मंगल कार्यालय, आकाशवाणी केंद्राजवळ,धाराशिव येथे करण्यात आले आहे.


या महोत्सवामध्ये नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन), तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम - समूह लोकनृत्य,समूह लोकगीत,कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कथालेखन,चित्रकला, वक्तृत्व व कविता लेखन या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या युवा महोत्सवात १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवती सहभागी होऊ शकतात.सहभागासाठी जन्मतारखेचा पुरावा म्हणून जन्माचा दाखला आणि जिल्ह्याचे रहिवासी असल्याचे प्रमाण म्हणून आधारकार्ड सादर करणे आवश्यक आहे.

इच्छुकांनी आपली नावनोंदणी दि.१८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत करावी. अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम, धाराशिव येथे प्रत्यक्ष सादर करता येईल किंवा districtsports. osmanabadgmail.com या ई-मेलवर पाठवता येईल.

अधिक माहितीसाठी अक्षय बिरादार, क्रीडा अधिकारी (मो. ८८३०३७४८०५) यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

## तुळजापुरात वाहतूक नियोजन कोलमडले



तुळजापूर(प्रतिनिधी)- भाविकांचा प्रचंड गर्दीमुळे रविवारी (दि. ९) तीर्थक्षेत्र तुळजापुरात वाहतुकीचे नियोजन कोलमडले. शहरातील बहुतांश भागात वाहतूक कोंडी झाल्याने वाहनांचा रांगा लागल्या होत्या. या वेळी नेहमीप्रमाणे पोलिस गायब असल्याने भाविकांसह नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे मनस्ताप सहन करावा लागला. रविवार सुटीचा योग साधत भाविकांनी तुळजाभवानी मातेचा दर्शनासाठी गर्दी केली होती. सकाळी दहा वाजेच्या सुमारास अचानक गर्दीत वाढ झाल्याने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ वाहतूक कोंडी झाली. या वेळी सोलापूर रस्त्यावरून अचानक मोठ्या संख्येने वाहने आल्याने छत्रपती शिवाजी महाराज चौक-नवीन बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी झाली. या वेळी सोलापूर रस्त्यावर घाटात वाहनांच्या रांगा लागल्या. यावेळी धाराशिव रस्त्यावर मलबा स्टॉप, नवीन बसस्थानकासमोर - लातूर रोड चौक आदी ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती. गर्दीचा अंदाज घेऊन पोलिसांनी वेळीच उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. भाविकांच्या गर्दीमुळे रविवारी तीर्थक्षेत्र तुळजापूरात रस्त्यावर वाहनांची कोंडी झाली.

दीपक चौक, आर्य चौकासह शहरात प्रमुख मार्गावर कोंडी शहरातील घाटशीळ रोडवर वन-वेची अंमलबजावणी करण्याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याने घाटशीळ रोडसह दीपक चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पोलिस संकुल, कोर्टासमोर वाहतूक कोंडी होत आहे. याशिवाय शहरातील कमानवेस, आर्य चौक आदी भागात वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत आहे.

## सोनारीत श्री काळ भैरवनाथाचा जन्माष्टमी उत्सव सोहळा



परंडा(प्रतिनिधी)-श्री क्षेत्र सोनारी (ता. परंडा) येथील श्री काळ भैरवनाथाचा जन्माष्टमी उत्सव मंगळवारी (दि. ११) मध्यरात्री १२ वाजता संपन्न होणार. श्री काळभैरवनाथ जन्माष्टमीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन भैरवनाथ देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. मंगळवारी (दि. ११ ) कार्तिक वद्य सप्तमीसह अष्टमी (अष्टमी प्रारंभ रात्री ११.१० पासून होत आहे. सकाळी ८ वाजता देवास अभिषेक, महापुजा, १२.३० वाजता आरती व महानैवेद्य. सकाळी ९ ते १२ या वेळेत जयवंत महाराज बोधले यांची कीर्तन सेवा, दुपारी १२ ते ३ रक्तदान शिबिर, सायंकाळी ६ वाजता देवाची महापूजा, रात्री ८ वाजता महाआरती व महानैवेद्य तर रात्री ९ ते १२ नारदीय कीर्तन रात्री १२ वाजता गुलाल उधळण्याचा कार्यक्रम, देवाचा पाळणा व आरती, भाविकांना पंचखाद्य व बुंदी प्रसाद वाटप.बुधवार (दि.१२ ) अष्टमी समाप्ती १० वा.२९ मी.होते. सकाळी ७ वाजता अभिषेक, ८ ते ११ महापुजा, दुपारी १२.३० वाजता महाआरती व महानैवेद्याने उत्सव सांगता होणार आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## दिल्लीतील घटना पाहुन डोळे उघडा..

लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ सोमवारी संध्याकाळी झालेल्या स्फोटात आतापर्यंत ९ जणांचा मृत्यू झाला आहे तर ३० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ झालेल्या कार स्फोटाच्या तपासात आता पुलवामा कनेक्शन समोर आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी संध्याकाळी दिल्लीत स्फोट झालेली कार पुलवामा येथील तारिकला विकण्यात आली होती. या स्फोटानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घोषणा केली की लाल किल्ल्याजवळील सुभाष मार्ग ट्रॅफिक सिग्नलवर हुंडई कारचा स्फोट झाला. पोलीस तपासात पुढे आलेल्या माहितीनुसार, ह्युंदाई कंपनीची कार या स्फोटांसाठी वापरली गेली. तर या कारचा मूळ मालक दिल्लीतला मोहम्मद सलमान हा आहे. सलमानने आपली कार ओखला भागातील नदीमला विकली. त्यानंतर नदीमन कार 'रॉयल कार झोन' या डीलरला विकली. दरम्यान या कारच्या खरेदी-विक्रीत बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आला होता असे सांगितले जात आहे. तर ज्या कारचा स्फोट झाला ती पुलवामा येथील रहिवासी तारिकला विकली गेली होती. तारिकच्या चाव्यांवर रॉयल कार झोन असे नाव आहे, ही फरिदाबादमधील वापरलेल्या गाड्या विकणारी कंपनी आहे. पुलवामाच्या तारीकने 'रॉयल कार झोन'कडून कार घेतली. तारीक मूळचा पुलवामाचा आहे पण तो फरीदाबादमध्ये राहत होता. फरीदाबादमध्ये २९०० किलो स्फोटके सापडलेला डॉ.मुझम्मील शकीलही पुलवामाचाच आहे. त्यामुळे मुझम्मील शकीलच्या अटकेनंतर तारीकने घाबरुन आत्मघाती हल्ला केल्याचा संशय आता व्यक्त केला जात आहे. दरम्यान, पोलीस तपासात अशी माहिती पुढे आली आहे कि, स्फोटापूर्वी ही कार तीन तासांहून अधिक काळ पार्किंगमध्ये उभी होती. या घटनेनंतर राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि राष्ट्रीय सुरक्षा गार्ड यांच्यासह अनेक तपास यंत्रणांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे की, 'सर्व शक्यतांचा विचार करून सखोल तपास करू आणि सर्व पर्यायांची तात्काळ चौकशी करून निष्कर्ष जनतेसमोर मांडले जातील'. या स्फोटाच्या काही तास आधी फरिदाबादमध्ये मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त करण्यात आली होती, त्यामुळे या दोन्ही घटनांचा एकमेकांशी संबंध आहे का, या दिशेनेही तपास केला जात आहे. आज काय अनेक वर्षापासून विध्वंसक अतिरेकी स्फोट घडवित आहेत ते कोण आहेत व कोठून प्रशिक्षण घेतलेले आहेत हे सर्वांना माहिती आहे. त्यांच्या नावावरून अनेक बाबीचा उलगडा होतो तरी भारतीय गप्प आहेत. दिल्ली ही देशाची राजधानी आहे. अशी राजधानी सुरक्षित आहे का? असे देशातील नागरिकांना वाटणे सहाजिकच आहे. देश सुरक्षित आहे मात्र देशातील काही शहरे आता सुरक्षित नाहीत असे या घटनेवरून दिसून येते. मुळात एक बाब तपासयंत्रणेंनी लक्षात घेतली पाहिजे की, कांही ठराविक गाव, शहरे व ठिकाणे आहेत तेथे स्थानिकांच्या आश्रयाने देशविरोधी काम करणारी मंडळी दिसून येते. ठराविक गावे आहेत तेथे दुर्लक्ष होत आहे. याचा परिणाम भोगावा लागत आहे. देशातील काही भागात लक्ष दिले पाहिजे. सतत पाळत ठेवली पाहिजे. जी घटना घडल्यानंतर पळापळ दिसून येते ती अगोदरच करणे अपेक्षित असते. आपल्या देशात घटना घडल्यावर पेटून उठले जाते. पलगामनंतर ऑपरेशन सिंदुर राबविले गेले. प्रशांसा झाली मात्र अतिरेक्याच्या पोटात दुखणे स्वाभाविक होते. किंबहुन त्याचा बदला घेतला जाऊ शकतो याची आठवण ठेवणे अपेक्षित होते. एक ना दिवस बदल्याची भावना निर्माण होणार व अप्रिय घटना देशात घडविणार हे सर्वांना माहिती होतेच, तेच घडले आहे. देशात दिल्लीच्या घटनेवरून बिहारमधील दुसऱ्याटप्पाच्या पुर्वसंध्येला स्फोट घडऊन आणणे ही मोठी साजीश असू शकते. केंद्रिय गृह मंत्री अमित शहा यांनी सर्व अँगलने तपासाचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे घटनेतील आरोपी सापडतील. यापेक्षाही घटना घडण्यापुर्वीची यंत्रणा राबणे आवश्यक होते यात कोठेतरी कमतरता राहीली आहे हे दिसून येते. मुळात अतिरेकी कोण आहेत. हिंसा घडविणारे कोण आहेत. त्याच प्रमाणे आश्रय देणारे कोण आहेत याचा शोध घेतला पाहिजे. पुर्व खबरदारी का घेतली नाही हा मोठा प्रश्न समोर उभा राहातो. अनेक दिवसापासून देशात स्फोट घडले नव्हते. अप्रिय घटना घडल्या नव्हत्या आता डोके वर काढले आहे. त्यामुळे पहलगामा घटनेनंतर अतिसतर्कता बाळगणे आवश्यक होते. दिल्लीत स्फोट घडविल्यास देशभर त्याचे पडसाद उमटतात हा कपटी हेतू अतिरेकीसंघटनेचा असू शकतो. मुळात असे प्रकार करणारे कोण आहेत. यामागील सुत्रधार कोणता देश आहे याची कल्पना जगाला आहे. तरी भारतीयांचे रक्त थंड आहे. किती देशासाठी नागरिक शहीद करणार? यात मरणारे निष्पाप मंडळी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. जी मंडळी आपआपली उपजीविकासाठी काबाडकष्ठ करतात अशांचा बळी यात जातो. पहलगाम मध्ये नावे विचारून गोळ्या घातला हा प्रकारे विचार करायाला लावणारा आहे. मोठे षडयंत्र आहे. कट्टरता आहे हे दिसून येते. त्यामुळे आता तरी भारतीयांनी डोळे उघडले पाहिजेत. देशात कालांतराने दिल्लीत स्फोट घडविले जातात. त्यापुर्वी अतिरेकी गुजरात मध्ये सापडतात. आरडीएक्सचा साठा फरीदाबाद मधून पकडला जातो. यात सापडणारे कोण आहेत ही बाब लपून राहीली नाही. ही बाब उघड आहे. स्फोटामागे कोणाचा हात आहे ही बाब लपून नाही. आंधळ्याचे सोंग घेणे उचित नाही तर देशासाठी घातक ठरणारे आहे. आगामी काळात तामीळनाडू विधानसभेची निवडणुक होणार आहे. देशात निवडणुक पुर्वी किंवा काळात स्फोट घडविले जातात. राष्ट्रीय सणाच्यावेळी स्फोट घडविले जातात हा आता पर्यंतचा अनुभव पाहाता सावध राहाणे हीताचे आहे. तरी दिल्लीची घटना पुर्व नियोजित असली पाहिजे. यामागे कोणाचा हात असेल यापेक्षा देशात अप्रिय व्यक्तीशी कोणाचे संबंध आहेत याचा शोध घेतला पाहिजे. मुळ कोठे आहे यावर घाला घातला पाहिजे. तरच विध्वसंक कारवायास आळा बसेल.

# नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ काय करावे व काय करु नये मार्गदर्शक सूचना जारी

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडील दि.०४ नोव्हेंबर २०२५ च्या आदेशान्वये ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ आणि कुळगाव-बदलापूर या नगरपरिषदांच्या सदस्य व अध्यक्ष पदांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२५ जाहीर करण्यात आला असून या कालावधीत काय करावे व काय करु नये याबाबतची मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केली आहे.

**काय आहेत मार्गदर्शक सूचना**
**जाणून घेवू या लेखातून**
**काय करावे व काय करू नये**

**काय करावे:-**

चालू असलेले कार्यक्रम/योजना पुढे सुरु ठेवता येतील. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोग/महानगरपालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/मान्यता प्राप्त करण्यात यावी. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व या संदर्भात चालू असलेल्या योजना पुढे सुरु ठेवता येतील. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समूचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना/ निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना/ निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडच्या वापर निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे. विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णतः अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात देणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ या बाबींशी संबंधित असावी. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविण्यात याव्यात. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक (Loudspeaker) किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांचे सहाय्य मिळविण्यात यावे. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्रि्चतपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्या विषयी खात्री करुन त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत. मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे. उमेदवार व त्यांच्या अधिकृत कार्यकत्यांनी विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले व ओळखपत्रे, निवडणूक प्रशासनाकडून मिळवावीत व ती निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ती दर्शनी भागावर लावावीत. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठया साध्या (पांढऱ्या कागदावर देण्यात येतील य त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. राज्य निवडणूक आयोगाचे, महानगरपालिका आयुक्त यांचे अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याहीवेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य) यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी/ क्षेत्र/प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. राज्य निवडणूक आयोग/ आयुक्त, महानगरपालिका/ जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश/ आदेश/अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

**काय करु नये**

शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनाचा समावेश असेल:- केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, पणन मंडळ (कोणत्याही नावाचे), सहकारी संस्था, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या/ग्रामपंचायती, ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था व संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, राज्य शासन, केंद्रीय पोलीस संघटना इत्यादीच्या मालकीची असलेली पुढील वाहने-मालमोटारी, लॉरी, टेंपो, जीपगाड्या, मोटारगाड्या, ऑटोरिक्षा, बसगाड्या, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दीष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषण करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करु नयेत. शासन/ सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ नियुक्त्या करु नयेत. मंत्री (राज्यमंत्री व उपमंत्रीसहित) हे उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत. निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी कान पार पाडण्यात येऊ नये. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये. मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. ज्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरुप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादी साठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये. लाच देणे, आवजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये. कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा लिहिणे इत्यादी करता येणार नाही. यामध्ये शासकीय, सार्वजनिक व खाजगी जागांचा समावेश असेल. इतर राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये किंवा मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये. एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मिरवणूक काढण्यात येऊ नये. दुसऱ्या पक्षांनी किंवा उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके, भित्तीपत्रके काढून टाकण्यात येऊ नयेत. मात्र याबाबत काही आक्षेप असल्यास पोलिसांच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठया वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षाजवळ प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये. ध्वनिक्षेपकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसविलेले असोत, सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी किंवा रात्री १०.०० वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करु नये. तसेच याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मिरवणुकीत किंवा प्रचारफेरीत ध्वनिक्षेपकाचा वापर करु नये. अशा सभा/ प्रचारफेरी रात्री १०.०० वाजल्यानंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन व्हावे तसेच घालून दिलेल्या अटींचे पालन करावे. याखेरीज, ती स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टीकोन आणि हवामान, सणासुदीचे दिवस, परिक्षेचा काळ यांच्या अधीनतेने असतील. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या पैशाचे, मद्याचे, वस्तूंचे वाटप करण्यात येऊ नये.



**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

# धम्मसेवक ग्रुपच्यावतीने डॉ. अनुजा कांबळे यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** पूजनीय भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली लातूरमध्ये बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी धम्मसेवक ग्रुपची स्थापना करण्यात आली. ग्रुपच्यावतीने. दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालय, लातूर येथील प्रा. अनुजा अरुण कांबळे ( धायगुडे) यांनी Impact of Modern Technology on Commerce and Management Education Pre and Post COVID-19 या विषयावर संशोधन करून पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांचे संशोधन आधुनिक तंत्रज्ञानाचा वाणिज्य आणि व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रावर झालेल्या प्रभावावर आधारित आहे. या यशाबद्दल त्यांचा एका कार्यक्रमांमध्ये सत्कार करण्यात आला. त्यांना कन्हैय्या लाल जोशी रात्रीचे वाणिज्य कॉलेज, लातूर येथील डॉ. सुजाता एन. चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सत्यवान कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे, ज्योतीराम लामतुरे, मिलिंद धावारे यांची प्रमुख उपस्थिती होती. साथिया फोटो स्टुडिओचे बालाजी धायगुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हर्षलता धायगुडे, राजा धायगुडे, अरविंद कांबळे, शितल कांबळे, दिपाली कांबळे, रेशमा काकडे, सुषमा चिकाटे, स्वप्नील बनसोडे, अरुण कांबळे, अँड अभी कांबळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गरोदरपणात केस गळण्यामागचे कारण काय; कंट्रोल करण्यासाठी करा खास उपाय

गरोदरपणात महिलांच्या शरीरात अनेक बदल दिसून येतात. या काळात हार्मोन्समध्ये चढ-उतार झाल्यामुळे समस्यांना सामोरे जावे लागते. अनेकदा स्त्रिया गरोदरपणात त्यांच्या केसांची खूप काळजी करतात. गरोदरपणात केस गळण्याची समस्या ही एक सामान्य समस्या आहे. ही समस्या काहींना जास्त आणि काहींना कमी प्रभावित करते, परंतु सर्व महिलांना याचा सामना करावा लागतो. गरोदरपणात केस गळण्याच्या स्थिती टेलोजन इफ्लुव्हियम नावाने ओळखली जाते. महिला योग्य काळजी घेऊन केस गळण्याची समस्या थांबवू शकतात.

**गरोदरपणात का गळतात केस**

गरोदरपणात केस गळण्याची समस्या ४० ते ५० टक्के महिलांना होते. काही महिलांवर या समस्येचा अधिक परिणाम दिसू शकतो आणि काही महिलांना कमी परिणाम दिसू शकतो. साधारणपणे गर्भधारणेच्या ३ ते ४ महिन्यांनंतर केस गळण्याची समस्या सुरू होते. ही समस्या तुम्हाला काही काळासाठी त्रास देते. साधारणपणे, ६ ते १२ महिन्यांच्या गर्भधारणेनंतर, ते स्वतःच नियंत्रणात येतात. गरोदरपणात शरीरातील इस्ट्रोजेनची वाढती पातळी केसांच्या चांगली वाढ होण्यास परिणामकारक असतात. अति तणावामुळेही ही स्थिती उद्भवते. याशिवाय लोह, जीवनसत्त्वे आणि खनिजांची कमतरता हे देखील याचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे समस्या टाळण्यासाठी सर्व महिलांना गर्भधारणेदरम्यान पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे.

**आहाराची घ्या विशेष काळजी**

आपल्या आहारात जास्तीत जास्त निरोगी फळे आणि भाज्यांचा समावेश करा. फ्लेव्होनॉइड्स आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध फळे निवडा, हे तुमचे केसांचे कूप निरोगी ठेवतात आणि केस मुळांपासून मजबूत करतात. हे पोषक घटक शरीरातील हार्मोन्सचे संतुलन राखतात आणि फळांचे योग्य सेवन केल्याने शरीर डिटॉक्स होते, ज्यामुळे केसांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते.

**या शॅम्पूचा करा वापर**

बायोटिन आणि सिलिका असलेले शाम्पू बाजारात सहज उपलब्ध आहेत. जर तुम्ही आधीच सल्फेट युक्त शॅम्पू वापरत असाल तर आजच तुमच्या केसांच्या निगामधून ते काढून टाका. बायोटिन आणि सिलिका हे केसांसाठी आवश्यक असलेले दोन घटक आहेत, जे टाळूमध्ये रक्त परिसंचरण वाढवतात आणि केसांच्या कूपांचे आरोग्य राखून मुळांपासून केस मजबूत करतात. अशा परिस्थितीत, गर्भधारणेदरम्यान तुम्हाला कमी किंवा कमी केस गळण्याचा सामना करावा लागतो.

**ओले केस विंचरू नका**

गर्भधारणेदरम्यान, स्त्रिया अतिशय संवेदनशील आणि मूडी राहतात आणि काहीवेळा जेव्हा त्यांचा मूड खराब होतो तेव्हा ते संयम गमावतात. अशा परिस्थितीत महिलांनी या काळात मन शांत ठेवण्यासाठी काही विशेष उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे आणि कोणतेही काम करताना घाई करू नये. उदाहरणार्थ, ओले केस ताबडतोब शॅम्पू करू नका, ओले केस सामान्य कोरड्या केसांपेक्षा अधिक संवेदनशील आणि कमकुवत असतात. या वेळी, विंचरु नका तेव्हा ते सहजपणे तुटतात. गरोदरपणात केस आधीच खराब झालेले असतात आणि मुळांपासून कमकुवत झालेले असतात, त्यामुळे ओल्या केसांना शॅम्पूने केस गळण्याची समस्या होऊ शकते. प्रथम केस नैसर्गिकरित्या कोरडे होऊ द्या आणि नंतर कंगवा करा.

**गरम गोष्टी टाळा**

जर तुम्ही तुमचे केस स्टाईल करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे हीटिंग टूल्स वापरत असाल तर आजपासून ते टाळा. गर्भधारणेदरम्यान, तुमचे केस आधीच संवेदनशील असतात, त्यामुळे गरम साधने त्यांना अधिक नुकसान करू शकतात. या परिस्थितीत सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे.

# सकाळच्या नाश्ताला पीनट बटर खाताय आयुर्वेदानुसार योग्य वेळ जाणून घ्या

पीनट बटरहा आपल्यापैकी अनेकांचा आवडीचा नाश्ता आहे. हे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक मानले जाते आणि चविष्ट देखील आहे. यामुळेच भरपूर एनर्जी देणारे पीनट बटर तरुणाईची पहिली पसंती बनले आहे. पीनट बटर हे अनेक जीवनसत्त्वे, फायबर, प्रथिने, निरोगी चरबी आणि खनिजांचे भांडार आहे. हे खाल्ल्याने तुम्हाला जास्त वेळ भूक लागणार नाही. यामुळेच याच्या सेवनाने वजन कमी होते. हे रक्तातील साखर कमी करते आणि हृदयाला अनेक आजारांपासून वाचवते. मात्र, शेंगदाण्यापासून बनवलेला हा पदार्थ खाण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**पीनट बटर खाण्याची योग्य वेळ**

पीनट बटर खाण्याचे अनेक फायदे आहेत, परंतु पीनट बटर कधी खावे हे जाणून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. साधारणपणे लोकांना नाश्त्यात ब्रेडसोबत पीनट बटर खायला आवडते. पण आयुर्वेदानुसार पीनट बटर खाण्याची ही योग्य वेळ नाही. तज्ञांच्या मते, लोक सहसा सकाळी ६ ते १० च्या दरम्यान नाश्ता करतात आणि याच वेळेत पीनट बटर खातात. परंतु असे केल्याने कफ दोष होण्याची शक्यता असते. सकाळी तेल आणि चरबीयुक्त शेंगदाणे खाणे टाळावे. त्याऐवजी, तुम्ही ते दिवसाच्या इतर कोणत्याही जेवणात समाविष्ट केले पाहिजे. तुम्ही व्यायाम केल्यानंतरही याचा डाएटमध्ये समावेश करू शकता.

**फायदे काय**

पीनट बटर आरोग्यासाठी हानिकारक आहे असे नाही, पण त्याचे योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खाणे महत्त्वाचे आहे. जर तुम्ही निरोगी असाल तर तुम्हाला पीनट बटर खाण्याचे अनेक फायदे होतील.

**मधुमेहावर नियंत्रण राहील**

मधुमेहाचा त्रास असलेल्या लोकांना आरोग्यदायी गोड खाण्याची इच्छा असेल तर त्यांच्यासाठी पीनट बटर हा पर्याय असू शकतो. रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवून मधुमेहाचा धोका कमी होतो. एका संशोधनानुसार, जे लोक आठवड्यातून पाच किंवा त्याहून अधिक वेळा पीनट बटर खातात त्यांना मधुमेहाचा धोका २१ टक्क्यांनी कमी होतो.

**कॅन्सरचा धोका कमी**

पीनट बटरमध्ये रेझवेराट्रोल आणि फायटोस्टेरॉलसारखे शक्तिशाली अँटिऑक्सिडंट असतात. म्हणूनच पीनट बटर कॅन्सरसारख्या धोकादायक आजाराशी लढायला मदत करते. एका अभ्यासानुसार, यामध्ये असलेले संयुगे कोलोरेक्टल कर्करोगाचा धोका कमी करतात.

**फोकस वाढवते**

कोणत्याही कामात यशस्वी होण्यासाठी लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे आणि यासाठी पीनट बटर उपयुक्त ठरू शकते. अभ्यासानुसार, पीनट बटरमध्ये असलेले पोषक आणि फोकस वाढवण्यास मदत करते.

**हृदय निरोगी राहील**

ओमेगा ३ फॅटी ॲसिडमध्ये भरपूर पीनट बटर तुमचे हृदय निरोगी ठेवते. हे खराब कोलेस्टेरॉलची पातळी कमी करते आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढवते. शेंगदाण्यामध्ये आर्जिनिन नावाचे नैसर्गिक अमीनो ॲसिड असते जे रक्तवाहिन्या मजबूत करते, ज्यामुळे हृदयातील रक्त परिसंचरण सुधारते.

# निरोगी मूत्रपिंडासाठी काही महत्वाच्या टिप्स



निरोगी मूत्रपिंडासाठी पुरेसे पाणी प्या, रक्तदाब आणि रक्तातील साखर नियंत्रणात ठेवा, सोडियम आणि उच्च-प्रथिनेयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा, आणि नियमित मध्यम व्यायाम करा.आहार आणि जीवनशैलीपुरेसे पाणी प्या: शरीराला हायड्रेटेड ठेवण्यासाठी आणि मूत्रपिंडातील खडे टाळण्यासाठी दररोज किमान ड़(८ड़) ते ड़(१०ड़) ग्लास पाणी पिणे महत्त्वाचे आहे.रक्तदाब आणि रक्तातील साखर नियंत्रणात ठेवा: उच्च रक्तदाब आणि मधुमेह मूत्रपिंडाच्या आजारांचे प्रमुख कारण आहेत, म्हणून या दोन्हीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.आहारावर नियंत्रण ठेवा:सोडियम (मीठ) कमी करा: जास्त मीठ खाणे टाळा.प्रथिने आणि पोटॅशियम नियंत्रित करा: जास्त प्रथिने आणि पोटॅशियमयुक्त पदार्थांचे सेवन मर्यादित करा.फळे निवडा: सफरचंद, बेरी आणि द्राक्षे यांसारखी कमी पोटॅशियम असलेली फळे खाणे फायदेशीर ठरू शकते.नियमित व्यायाम करा: मध्यम व्यायामामुळे मूत्रपिंडाचे आरोग्य सुधारते.धूम्रपान आणि मद्यपान टाळा: धूम्रपान आणि अति मद्यपान मूत्रपिंडासाठी हानिकारक आहेत.इतर खबरदारीनियमित आरोग्य तपासणी करा: थकवा, लघवीतील बदल, सूज किंवा उच्च रक्तदाब यांसारख्या लक्षणांकडे लक्ष द्या आणि डॉक्टरांचा सल्ला घ्या.डॉक्टरांचा सल्ला घ्या: कोणतीही आरोग्य समस्या असल्यास किंवा आहारातील बदल करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

# स्वदेशी अभियानातून वस्त्रोद्योगाला उभारी

**अमेरिकेने भारतावर निर्बंध घातल्याचा परिणाम जाणवू नये, म्हणून केंद्र सरकारने जसा अन्य देशांशी व्यापार वाढवण्याचा निर्णय घेतला आहे, त्याच प्रकारे देशांतर्गत बाजारात उठाव वाढावा म्हणून जीएसटी करांची फेररचना केली. त्याचबरोबर स्वदेशी अभियानाच्या माध्यमातून देशातील वस्तूंची खरेदी वाढावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचा वस्त्रोद्योगाला मोठा आधार मिळाला आहे. वस्त्रोद्योग क्षेत्रातील या भरारीचा वेध.**

केंद्र सरकारने देशभरात स्वदेशी मोहीम सुरू करण्याची घोषणा केली आहे. या मोहिमेचा उद्देश हातमाग, हस्तकला आणि घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवणे हा आहे. विशेषतः शहरी तरुणांमध्ये आणि 'जनरेशन झेड'वर या अभियानाचा परिणाम झाला, तर भारतात देशांतर्गत उत्पादित कापडाची मागणी दरवर्षी नऊ-दहा टक्क्यांनी वाढेल आणि २०३० पर्यंत ती २५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल. वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या मते, २०२४ मध्ये भारताची कापड आणि वस्त्रोद्योग बाजारपेठ १७९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. गेल्या वर्षी तिचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे सात टक्के होता. देशातील उत्पादित कापडाचा देशांतर्गत बाजारपेठेतील वाटा ५८ टक्के आहे आणि तो अंदाजे ८.१९ टक्क्यांनी वाढत आहे. परदेशातून आयात केलेल्या कपड्याचा वापर २१ टक्के असून वार्षिक ६.७९ टक्क्यांनी वाढत आहे. घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवण्यासाठी तरुणांना आणि शहरी वर्गाला सहभागी करून घेण्याचे महत्त्व या आकडेवारीवरून स्पष्ट होते. भारतीय कापडांना तरुणांमध्ये अभिमान आणि शैलीचे प्रतीक बनवणे, हा स्वदेशी मोहिमेमागील प्राथमिक उद्देश आहे. या उपक्रमामुळे केवळ तरुण ग्राहकांमध्ये स्वदेशी उत्पादनांची स्वीकृती वाढणार नाही, तर वीणकर, कारागीर आणि सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) उत्पन्न आणि बाजारपेठेच्या संधीदेखील वाढतील. या उपक्रमांतर्गत विविध मंत्रालये, सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्स आणि शैक्षणिक संस्थांना त्यांच्या कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी गणवेश आणि सजावटीमध्ये भारतीय बनावटीचे कापड स्वीकारण्यास प्रोत्साहित केले जाईल.

सरकारच्या ताज्या निवेदनानुसार स्वदेशी मोहीम उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजना, 'पीएम मित्र पार्क' आणि 'एक जिल्हा, एक उत्पादन उपक्रम' यासह विद्यमान कार्यक्रमांना पूरक ठरेल. ही मोहीम 'सोशल मीडिया', राज्यस्तरीय भागीदारी आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे तरुणांपर्यंत पोहोचेल. याव्यतिरिक्त, जीएसटी दरांमध्ये अलीकडच्या काळात झालेल्या बदलांमुळे देशांतर्गत आणि बिगर-देशांतर्गत वापर वाढेल. यामुळे देशात कापड आणि कपड्यांची मागणी वाढू शकते. मंत्रालयाने या मोहिमेचे केंद्रबिंदू म्हणून विशेषतः शहरी तरुणांना आणि 'जनरेशन झेड' पिढीला लक्ष्य केले आहे. भारतीय कापड परिधान करणे केवळ पारंपरिकच नाही, तर स्टायलिश आणि फॅशनेबलदेखील असू शकते हे त्यांना दाखवणे हा यामागील उद्देश आहे. या उपक्रमामुळे तरुणांना स्थानिक कारागीर आणि विणकरांना पाठिंबा देण्यासाठी प्रेरणा मिळेल. स्वदेशी मोहिमेमुळे केवळ ग्राहकांना फायदा होणार नाही, तर लघू आणि मध्यम उद्योग तसेच हस्तकला उद्योगांना रोजगार आणि बाजारपेठेत प्रवेश वाढण्याची संधी मिळेल. वीणकर आणि कारागीरांना आपली उत्पादने थेट ग्राहकांना विकण्याची संधी मिळेल. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होईल. अशा उपक्रमांमुळे केवळ कापड उद्योगाला चालना मिळणार नाही, तर स्वदेशी उत्पादनांची जागतिक मान्यता मजबूत होईल. एकंदरीत, स्वदेशी मोहीम ही एक महत्त्वपूर्ण पायरी आहे, जी २०३० पर्यंत देशांतर्गत कापडाची मागणी २५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्यास मदत करेल.तरुणाई आणि



'जनरेशन झेड'चा सहभाग, सरकारी पाठिंबा, 'एमएसएमई'कडून मिळणारा पाठिंबा आणि 'सोशल मीडिया मोहिमा' या उपक्रमाला यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. भारताचा कापड उद्योग आता फक्त कपडे बनवण्यापुरता मर्यादित नाही, तर तो नवोपक्रम आणि शाश्वततेकडे एक मोठा बदल म्हणून पाहत आहे. पर्यावरणपूरक कापड, डिजिटल तंत्रज्ञान आणि पुनर्वापर वाढत आहे. त्याचा पर्यावरण रक्षणालाही फायदा होत आहे. कापड उद्योग आता नवीन तंत्रज्ञान आणि 'ग्रीन थॉट'सह भविष्याकडे वाटचाल करत आहे. नवोपक्रम उद्योगाचा चेहरा-मोहरा बदलत आहे. कापड उद्योग जुन्या पद्धतींपेक्षा पुढे जात आहे आणि स्मार्ट कापड आणि शाश्वत उत्पादन तंत्रांचा अवलंब करत आहे. कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्ता, थ्री डी प्रिंटिंग आणि 'बायोफॅब्रिकेशन'सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करत असल्यामुळे कपडे चांगलेच नाहीत, तर पर्यावरणपूरकदेखील बनत आहेत. डिजिटल रंगकारी आणि पाणीरहित प्रक्रिया यासारख्या तंत्रज्ञानामुळे आता कापड उत्पादनात पाणी आणि रसायनांचा वापर कमी होत आहे. फॅशन उद्योगावर वाढत्या पर्यावरणीय दबावामुळे, ब्रँड आता शाश्वत कापडांवर भर देत आहेत. पुनर्वापर केलेले पॉलिस्टर, सेंद्रिय कापूस आणि बांबू किंवा जूटसारखे नैसर्गिक तंतू नवीन पर्याय बनत आहेत. शिवाय, अनेक कंपन्या सर्क्युलर फॅशन मॉडेल स्वीकारत आहेत. ते जुन्या कपड्यांचे नवीन कपड्यांमध्ये पुनर्वापर करतात. हा उपक्रम केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाही, तर ग्राहकांना खरेदी करण्यास प्रेरित करतो.भारत जगातील सर्वात मोठ्या कापड उत्पादकांपैकी एक असून शाश्वत कापडनिर्मिती आणि व्यवहाराकडे वेगाने वळत आहे. सरकार 'मेक इन इंडिया' आणि 'टेक्स्टाइल पार्क'सारख्या योजनांद्वारे हरित उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. निर्यात क्षेत्रातही शाश्वत कापडांची मागणी वाढत आहे. त्यामुळे भारताला मजबूत पाय रोवता येत आहेत. भविष्यात भारतीय कापड उद्योग आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणदृष्ट्याही जागतिक स्तरावर आघाडीची भूमिका बजावण्यास सज्ज आहे. कापड उद्योगाचे भविष्य आता नवोपक्रम, शाश्वतता आणि तंत्रज्ञानाच्या नवीन अंतर्विरोधाशी जोडले आहे. हा बदल केवळ फॅशनची दिशा बदलत नाही, तर पृथ्वीचे भविष्यदेखील सुरक्षित करत आहे. 'ग्रीन फॅशन'चा ट्रेंड वाढला आहे. परिणामी, निसर्गावर आधारित कपड्यांची मागणी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. भारतासह पाच देशांनी नैसर्गिक साहित्यापासून बनवलेले कपडे वेगाने स्वीकारले आहेत. पॅरिस, मिलान आणि टोकियो येथील फॅशन शोमध्ये, डिझायनर्स आता जुन्या जीन्स, उरलेल्या धाग्यापासून आणि कापडाच्या तुकड्यांपासून नवीन कपडे तयार करत आहेत. भारतात दिल्ली, जयपूर आणि मुंबईमधील तरुण डिझायनर्स नैसर्गिक रंग, खादी, हातमाग यांच्या माध्यमातून जुने कापड वापरून नवे कपडे तयार करत आहेत. या सर्वांचा परिणाम प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय वस्त्रोद्योगाला सावरण्यास मदतकारक होत आहे.

– प्रा. सुखदेव बखळे (लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

# रासायनिक हल्ला म्हणजे काय?

गुजरात दहशतवाद विरोधी पथकाने 'आयएसकेपी' या दहशतवादी संघटनेशी संबंधित रासायनिक हल्ल्याचे मोठे कारस्थान उधळून लावले. 'रायसिन' या अत्यंत विषारी पदार्थाचा वापर करून हा हल्ला करण्याची दहशतवाद्यांची योजना होती. हा रासायनिक हल्ला नेमका काय असतो? यासंदर्भात जाणून घेऊ...

**रासायनिक हल्ला**

रासायनिक हल्ला म्हणजे जाहीरपणे विषारी रासायनिक पदार्थ, विषारी वायू किंवा जीवाणूजन्य विष यांचा वापर करून माणूस, प्राणी किंवा पर्यावरणावर जाणूनबुजून केलेला हल्ला. हा सामूहिक संहाराच्या शस्त्रांपैकी एक मानला जातो, कारण याचे परिणाम अत्यंत गंभीर, व्यापक आणि दीर्घकाळ टिकणारे असू शकतात.

**हल्ल्याचा उद्देश**

कमी वेळेत जास्तीत जास्त नागरिकांना मारणे किंवा गंभीर जखमी करणे, सामान्य नागरिकांमध्ये आणि प्रशासनामध्ये भीती व गोंधळ निर्माण करणे. तसेच सार्वजनिक सेवा आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठी अडचण निर्माण करणे हे या हल्ल्यामागचे उद्देश असतात.



**प्रमुख रासायनिक पदार्थ**

रासायनिक हल्ल्यांसाठी अनेक प्रकारचे अत्यंत विषारी पदार्थ वापरले जातात. उदा. सरीन, तबून : हे पदार्थ मज्जासंस्थेवर हल्ला करतात. यामुळे स्नायूंवर नियंत्रण गमावणे, श्वास घेण्यास त्रास होणे असे त्रास होऊन काही मिनिटांत मृत्यू होऊ शकतो.मस्टर्ड गॅस : हे त्वचा, डोळे आणि श्वसनमार्गावर गंभीर फोड तयार करतात, ज्यामुळे त्वचा कायमस्वरूपी खराब होते आणि फुफ्फुसांना नुकसान पोहोचते.

क्लोरीन, फॉस्जीन : हे पदार्थ फुफ्फुसांवर हल्ला करून श्वसनमार्गात सूज आणि द्रव जमा करतात, ज्यामुळे व्यक्तीचा गुदमरून मृत्यू होतो.
सायनाइड : हे शरीराच्या पेशींना ऑक्सिजनचा वापर करण्यापासून थांबवतात, ज्यामुळे शरीराचा अंतर्गत भाग निकामी होतो.
रायसिन : हे एरंडाच्या बियांपासून मिळणारे एक अत्यंत विषारी प्रथिन विष आहे. ते श्वास किंवा अन्न-पाण्यातून शरीरात गेल्यास घातक ठरते. हे सायनाइडपेक्षाही हजारो पटीने अधिक विषारी मानले जाते. रायसिन विषावर कोणतेही विशिष्ट औषध उपलब्ध नाही.

**हल्ल्याची पद्धत**

क्षेपणास्त्र किंवा रॉकेट : रासायनिक शस्त्रे विशेषतः तयार केलेल्या क्षेपणास्त्रांमध्ये किंवा रॉकेट्समध्ये भरली जातात आणि लक्ष्यित क्षेत्रावर डागली जातात. उदाहरणार्थ, सिरियातील घौटा येथे झालेल्या हल्ल्यात सरीन वायू असलेले रॉकेट वापरले गेले होते.
तोफगोळे किंवा बॉम्ब : तोफगोळ्यांमध्ये किंवा विमानांद्वारे टाकल्या जाणार्या बॉम्बमध्ये विषारी रसायन भरून स्फोट घडवून आणणे.
फवारणी : विमान, ड्रोन किंवा वाहनांचा वापर करून विषारी वायू किंवा द्रव हवेत किंवा लक्ष्यित क्षेत्रावर फवारणे.

पाण्यात किंवा हवेत मिसळणे : पिण्याच्या पाण्याच्या साठ्यात, अन्न पुरवठ्यात किंवा सार्वजनिक वातानुकूलन प्रणालीमध्ये विषारी पदार्थ मिसळणे. साधारणपणे, हे हल्ले वायुयुक्त स्वरूपात केले जातात, जेणेकरून विषारी कण हवेत मिसळून मोठ्या क्षेत्रावर आणि कमी वेळेत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचू शकतील.

**जागतिक प्रतिबंध**

'ऑर्गनायझेशन फॉर प्रोहिबिशन ऑफ केमिकल वेपन्स' (ओपीसीडब्लू) ही संस्था भारतासह १९३ सदस्य राष्ट्रांकडे असलेले रासायनिक शस्त्रांचे साठे आणि निर्मिती सुविधा नष्ट करण्याच्या प्रक्रियेवर कार्य करते. नेदरलँडमध्ये या संस्थेचे मुख्यालय आहे.

## डॉक्टर टीप्स



### स्तनपान देणार्या नवमातांसाठी खास ८ एक्सपर्ट टीप्स !



असे स्तनपान केल्याने बाळ दूध चोखण्यास शिकते व त्याची वाढ नैसर्गिकरित्या होण्यास मदत होते.या सर्व गोष्टीतून बाळाचे योग्य पोषण होते,त्याला तुमच्या सोबत सुरक्षित वाटते,सकारात्मक हॉर्मोन्सची निर्मिती होते व तुमचे नाते बाळासोबत अधिक दृढ होत जाते.याचप्रमाणे अधिक फायद्यासाठी आईने स्तनपानात स्तन बदलताना देखील सभ्यता व विवेक बाळगावा. जाणून घ्या बाळाला डायपर रॅशेसपासून वाचवण्याचे '५' उपाय

८. दत्तक बाळाला स्तनपान करता येते का?
होय दत्तक बाळाला स्तनपान करता येते याला प्रेरीत स्तनपान किंवा एन्डूस्ड लॅक्टेशन असे म्हणतात.सुरुवातीला दत्तक बाळाला कुटूंबात सामिल करुन घेण्यासाठी व दूध पुरवठा वाढवण्यासाठी या संकल्पनेचा तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.यासाठी काही आयुर्वेदीक हर्ब्स व दूध पुरवठा वाढवण्या-या

## विनोद




एक डॉक्टर – तुमच्या दवाखान्यात असं कधी होतं का की एखादा रोगी एखाद्या रोगामुळे मरतो पण शवविच्छेदनात तो दुसऱ्याच रोगाने मेल्याचे कळते. दुसरा डॉक्टर – नाही, आमच्याकडे रोगी त्याच रोगाने मरतो, ज्या रोगासाठी आम्ही त्याच्यावर इलाज केलेला असतो.

## संदेश

Pappu : Aaj maine apne class ki sabse pyari larki ko phasa li..
Sohan : Woh kaisey?
Pappu:class lagi thi.. Maine kagaz ka jahaz bana ke Pheinka. Jahaz teacher ke pass chala gaya. Us ne gussey se poocha yeh kiss ne pheinka? Maine us larki ka nam le liya or woh phas gaye bichari.

## सुविचार




जे आनंदरूप करते ते खरे प्रेम हो.
**– अज्ञात**

**संस्कृत सुभाषित**

**दुर्जन: प्रियवादीच नैतद्**
**विश्वासकारणम् । मधु तिष्ठति**
**जिव्हाग्रे हृदि हालाहलं विषम् ॥**

**अर्थ** : दुष्ट माणूस गोड बोलत असला तरी त्याच्यावर विश्वास ठेवू नये. कारण त्याच्यावर जिभेवर मध असला तरी हृदयात मात्र भयंकर विष असते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. नारळाचा अर्धा भाग
३. मालिश
५. पाऊल
९. खटला, दावा
१०. थांबून थांबून, विश्रांती घेत
१२. नेत्रकटाक्ष
१५. राग आणणारे
१८. औषधाचे प्रमाण
१९. कार्य, काज
२०. एकाच्या हातून दुसऱ्याच्या हाती अशाप्रकारे
२१. झाकण असलेले पात्र
२३. विष्ठेचे खत
२४. माणूस
२६. वर्तमानपत्रातील कप्पा
२८. अपवित्र
३०. कर्ण
३१. रसाळ
३३. अनावश्यक, नको असता
३५. कावळ्याचे ओरडणे
३६. बाजेची कापडी पट्टी
३७. अपशकुन
३८. कुरआनातील आयात (ेक)
३९. मारणे
४१. संभाषण
४६. चेहऱ्यावरील कांती
४९. विद्वत्ता असली तरी घमेंड नको हे सांगणारा वाक्प्रचार
५३. तारांब, धांदल
५५. चंद्राची कड
५६. नामी युक्ती
५८. पातळसर
६०. मुलांची मांजर
६१. सगळी
६२. शाहीराजवळचे चर्मवाद्य
६३. दक्ष
६५. धनादेश
६७. तरुण्य
६८. उत्तराधिकारी
७०. ऐनवेळेला कच खाणारा
७३. पत्नी
७५. ऋण
७६. राख
७७. वाळलेले गवत, जनावरांचे खाद्य
७८. पसरलेले, विस्तृत

## उभे शब्द

१. दयामया नसलेला
२. नमस्कार
३. गम्माडीगंमत
४. मानवी कत्तल
५. गुरांचा समूह
६. कामदेव
७. आनंद
८. सुंदर डोळ्यांची
९. पदार्थाचा सूक्ष्म भाग
१०अ. वानर
११. कामापुरते नाते
१३. मृत्यूदेवता
१४. चोख सोन
१६. वडील
१७. तरुण, सैनिक
२०. यालाच जगन्नाथ समजावे!
२२. पोते
२३. शिडी, पायरी
२४. माणुसकी
२५. आशीर्वाद
२७. कृती
२९. न दिसणारी जखम
३०. चुलता
३२. पशू
३४. शक्ती, क्षमता
४०. बाराचा संच (इंग्रजी)
४२. बातमी
४३. शास्त्र, कला
४४. अंत:करण
४५. आत्याचा मुलगा
४७. देवदर्शनासाठी फिरणारा
४८. अधिक श्रेष्ठ
४९. दगाफटका करणारा
५०. नम्र
५१. कर्जाऊ रक्कम
५२. दु:ख
५४. घर,५६. हिशोब (हिंदी)
५७. तत्काळ, लगेच
५९. शरीराची ठेवण
६३. शिर्डीचे संत
६४. अभिनव
६५. उत्साह, जोम
६६. सिंह राशीतील नक्षत्र
६९. पुढचे पाठ आणि मागचे ---!
७०. लेखी विनंती
७१. ताठा, गर्व
७२. एखाद्याची बाजू घेणे, कार्यात हातभार लावणे म्हणजे -- उचलणे
७४. वरिष्ठांचा राग, संताप

## आडवे उत्तर

१.करवंटी ३.मर्दन ५.कदम ९.कज्जा
१०.दमादमाने १२.नयनबाण १५.संतापजनक
१८.मात्रा १९.काम २०.हातोहात २१.डबा
२३.सोनखत २४.मानव २६.रकाना
२८.नापाक ३०.कान ३१.रसदार ३३.नसता
३५.कावकाव ३६.नवार ३७.नाट
३८.कलमा ३९.ताडन ४१.संवाद ४६.रया
४९.विद्या विनयेन शोभते ५३.त्रेधा ५५.कोर
५६.हिकमत ५८.सरसरीत ६०.माऊ ६१.सारी
६२.डफ ६३.सावधान ६५.चेक ६७.तरुणाई
६८.वारस ७०.अवसानघातकी ७३.बायको
७५.कर्ज ७६.रक्षा ७७.कडबा ७८.पसरट

## उभे उत्तर

१.कर्दनकाळ २.वंदन ३.मज्जा ४.नरसंहार
५.कलप ६.मद ७.मद ८.सुनेत्रा ९.कण
१०अ.माकड ११.मामा १३.यम
१४.बावनकस १६.तात १७.जवान २०.हात
२२.बारदान २३.सोपान २४.मानवता
२५.वरदान २७.कारवाई २९.मुका मार
३०.काका ३२.जनावर ३४.ताकद
४०.डझन ४२.वार्ता ४३.विद्या ४४.मन
४५.आतेभाऊ ४७.यात्रेकरी ४८.सरस
४९.विश्वासघातकी ५०.विनित ५१.येणे
५२.शोक ५४.धम ५६.हिसाब
५७.तडकसार ५९.बांधा ६३.साईबाबा
६४.नवा ६५.चेव ६६.मघा ६९.सपाट
७०.अर्ज ७१.नक्षा ७२.तळी
७४.कोप



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारताची सून होणार ऑस्ट्रेलियाची खेळाडू, ताजमध्ये उरकला साखरपुडा

**कोण आहे ही 'स्टार' प्लेयर?**

आगरा-महिला बिग बॅश लीग सध्या सुरू आहे आणि भारतीय खेळाडू जेमिमा रॉड्रिग्ज देखील सहभागी होत आहे. जेमिमा या महिन्यात भारताला पहिला एकदिवसीय विश्वचषक जिंकणाऱ्या संघाचा भाग होती. पण इथे, आपण भारताच्या या मुलीबद्दल बोलत नाही आहोत, तर भारताच्या भावी सुनेबद्दल बोलत आहोत, जिने तिच्या गोलंदाजीत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

कोण आहे भारताची होणारी भावी सून?

ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटमधील एक प्रसिद्ध खेळाडू जिचा साखरपुडा पंजाबमधील एका पुरूषाशी झाला आहे. ही खेळाडू दुसरी तिसरी कोणी नसून अमांडा वेलिंग्टन आहे. या जोडप्याने ताजमहालमध्ये साखरपुडा केला. अमांडा वेलिंग्टन महिला बिग बॅश लीगमध्ये ॲडलेड स्ट्रायकर्सकडून खेळत आहे. तिने मेलबर्न स्टार्सविरुद्ध उत्कृष्ट गोलंदाजी केली.

***

### रणजी ट्रॉफीमध्ये जम्मू काश्मीरने रचला इतिहास, ९६ वर्षांत असे पहिल्यांदाच घडले!

**दिल्लीच्या पराभवात 'शर्माजी का** विकेट्सने हरवून इतिहास रचला. १९३४ मध्ये सुरू झालेल्या या घरगुती स्पर्धेच्या ९६ वर्षाच्या इतिहासात जम्मू आणि काश्मीरने दिल्लीला हरवण्याची ही पहिलीच वेळ आहे. जम्मू आणि काश्मीरच्या विजयात आकिब नबीनला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. तथापि, कर्णधार पारस डोगरा, कामरान इक्बाल आणि जम्मू आणि काश्मीरचा खेळाडू वंशराज शर्मा हा देखील चमकला.कामरान इक्बालने एकट्याने १७९ पैकी १३३ धावा केल्या. घरच्या मैदानावर खेळताना, दिल्लीने जम्मू आणि काश्मीरसाठी १७९ धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे त्यांनी फक्त तीन गडी गमावून पूर्ण केले. जम्मू आणि काश्मीरच्या धावांचा पाठलाग करण्यात कामरान इक्बालने महत्त्वाची भूमिका बजावली, १७९ धावांपैकी १३३ धावा केल्या आणि विजय मिळवला.प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २११ धावा केल्या. जम्मू आणि काश्मीरचा गोलंदाज आकिब नबीने दिल्लीला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने पहिल्या डावात ३५ धावांत ५ बळी घेतले.

***

### जम्मू काश्मीरचा दिल्लीला दणका; ६५ वर्षात प्रथमच रणजीच्या लढतीत मिळवला विजय

दिल्ली-लिंबूटिंबू नव्हे तर मुख्य प्रवाहातील संघ म्हणून प्रस्थापित होऊ पाहणाऱ्या जम्मू काश्मीर संघाने रणजी करंडक स्पर्धेत पहिल्यांदाच दिल्लीला चीतपट केलं. ६५ वर्षात पहिल्यांदाच जम्मू काश्मीर संघाने दिल्लीला नमवण्याची किमया केली. १९६० पासून दिल्ली आणि जम्मू काश्मीर ४३ वेळा आमनेसामने उभे ठाकले. यापैकी ३७ सामन्यात दिल्लीने थेट विजय मिळवला.रणजी करंडक स्पर्धेत, ४ सामन्यांनंतर दिल्लीचे ७ गुण झाले आहेत. बाकी ६ संघांचीही हीच स्थिती आहे. बादफेरीसाठी पात्र ठरण्यासाठी दिल्लीला चमत्कार घडवावा लागेल. अंतर्गत बंडाळ्यांनी नेहमीच ग्रस्त असलेल्या दिल्लीचे डावपेच अनाकलनीय असे होते. अनुभवी कर्णधार नसणं, गटातटाचं राजकारण याचा फटकाही दिल्लीला बसला आहे.

दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या लढतीत जम्मू काश्मीरने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. ऑक्वीब नबीच्या ५ विकेट्सच्या बळावर काश्मीरने दिल्लीचा डाव २११ धावांतच गुंडाळला. दिल्लीतर्फे आयुश दोसेजाने ६५ तर कर्णधार आयुष बदोनीने ६४ धावांची खेळी केली.

***

### मुंबई इंडियन्स २ स्टार खेळाडूंना दाखवणार बाहेरचा रस्ता?

मुंबई-आयपीएल २०२६ साठी ट्रेड सूरू आहे.तर आयपीएलमधील सर्व संघांना येत्या १५ नोव्हेंबर २०२५ ला रिटेन्शन यादी जाहीर करायची आहे. या रिटेन्शन यादी आधी मुंबई इंडियन्समधून मोठी अपडेट समोर आली आहे. त्यानुसार मुंबई दोन खेळाडूंना रिलीज करण्याची शक्यता आहे. हे खेळाडू कोण असणार आहेत? हे जाणून घेऊयात.खरं तर मुंबई इंडियन्सने अद्याप त्यांची रिटेन्शन यादी जाहीर केली नाही आहे. पण त्याआधी ऑस्ट्रेलियाचा दिग्गज खेळाडू मॅथ्यू हेडनने मुंबई इंडियन्सवर मोठी भविष्यवाणी केली आहे. मुंबई इंडियन्स आपल्या संघातून वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टला रिलीज करू शकते. यासोबत मुंबई इंडियन्स दीपक चाहला देखील रिलीज करण्याची शक्यता आहे. तिरंगी मालिकेतील दमदार कामगिरीमुळे अन्वयला भारताच्या मुख्य अंडर-१९ संघात स्थान मिळू शकते.भारतीय संघ सध्या १९ वर्षाखालील विश्वचषकासाठी तयारी करत आहे.

## जागतिक नेमबाजी स्पर्धेत सम्राट राणाला सुवर्णपदक



कैरो : कर्नालचा युवा नेमबाज सम्राट राणा याने जागतिक नेमबाजी स्पर्धेत भारतासाठी सुवर्णपदक जिंकले. सोमवारी, इजिप्तमधील कैरो येथे झालेल्या चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या दिवशी, सम्राटने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत २४३.७ गुणांसह पहिले स्थान पटकावले.

चीनच्या हू काई (२४३.७ गुण) ने रौप्य पदक जिंकले, तर आणखी एक भारतीय, वरुण कुमार (२४३.७ गुण) ने कांस्य पदक जिंकले. महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत दुहेरी ऑलिंपिक पदक विजेत्या मनू भाकर आणि ईशा सिंग यांचे पदक थोडक्यात हुकले. भारताने मंगळवारी दोन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य पदक जिंकले. यामुळे भारताच्या पदकांची संख्या १३ झाली आहे, ज्यात तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि तीन कांस्य पदकांचा समावेश आहे. सध्या, पदक तालिकेत भारत दुसऱ्या स्थानावर आहे.

मनू अंतिम फेरीत चांगली कामगिरी करत होती पण १४ व्या शॉटमध्ये ८.८ गुणांच्या खराब गुणांमुळे ती अव्वल स्थानावरून सातव्या स्थानावर घसरली. १३९.५ गुणांसह ती पदकाच्या शर्यतीतून बाहेर पडली. तसेच, ईशा दबावाखाली दिसत होती. अंतिम फेरीत १०.७ गुणांच्या शानदार कामगिरीनंतर, ती १४ व्या शॉटमध्ये फक्त ८.४ गुण मिळवू शकली आणि सहाव्या स्थानावर राहिली.

## आफ्रिकेविरुद्धची मालिका महत्त्वाची!

**भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजचे वक्तव्य**



कोलकाता-जागतिक अजिंक्यपद कसोटी स्पर्धेतील (डब्ल्यूटीसी) विद्यमान विजेत्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणारी दोन सामन्यांची मालिका नव्या हंगामात गुणकमाईच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे वक्तव्य भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने केले.

भारतीय संघ 'डब्ल्यूटीसी'च्या गुणतक्त्यात सध्या तिसऱ्या स्थानावर आहे. त्यांनी इंग्लंडविरुद्धची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली आणि त्यानंतर मायदेशात वेस्ट इंडिजला २-० असे हरवले. दुसरीकडे दक्षिण आफ्रिका संघाने विजेतेपदानंतर खेळलेल्या पहिल्या मालिकेत पाकिस्तानला १-१ असे बरोबरीत रोखून हंगामाची आश्वासक सुरुवात केली आहे.''डब्ल्यूटीसीच्या नव्या हंगामातील ही मालिका खूप महत्त्वाची आहे.

दक्षिण आफ्रिका गतविजेते असल्यामुळे आम्हाला त्यांचा आदर करावाच लागेल. अर्थात, भारतीय संघाची चांगली तयारी असून, संघातील वातावरणही सकारात्मक आहे. इंग्लंडमध्ये मालिकेतील बरोबरी आणि त्यानंतर मायदेशातील विंडीज संघावरील विजय यामुळे आमचा आत्मविश्वासही उंचावलेला आहे. सर्वच खेळाडू लयीत असल्यामुळे या मालिकेत चांगल्या कामगिरीचा विश्वास आहे,'' असे सिराज म्हणाला.

विशेष म्हणजे जसप्रीत बुमराच्या उपस्थितीत आणि गैरहजेरीतही सिराजने आपली चांगली लय राखली आहे. इंग्लंडविरुद्ध पाच कसोटीत त्याने २३ गडी बाद करण्याची किमया साधली, तर वेस्ट इंडिजविरुद्धही दोन सामन्यांत १० गडी बाद केले.

''वैयक्तिक कामगिरीबाबत मी नक्कीच समाधानी आहे. मी लयीत आहे. त्याचा पुरेपूर फायदा घेण्याचा मी प्रयत्न करेन. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या नव्या आव्हानासाठी मी सज्ज आहे,'' असे सिराजने सांगितले.

## भारत - द. आफ्रिका कसोटी मालिकेत आधी टी, मग लंच ब्रेक!

**क्रिकेटची सुमारे १५० वर्षांची परंपरा मोडीत**





मुंबई : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला १४ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. पहिली कसोटी कोलकात्यातील ईडन गार्डन्सवर खेळली जाईल, तर दुसरा सामना २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथे रंगणार आहे. या दुसऱ्या कसोटीत एक अनोखा बदल पाहायला मिळणार आहे, तो म्हणजे लंचपूर्वी टी ब्रेक घेतला जाणार आहे. भारतात कसोटी सामन्यांमध्ये असा बदल प्रथमच होणार आहे.

टॉस, लंच, चहा, स्टंप (दिवसाचा खेळ संपला) कसोटी सामन्यांमध्ये हा नेहमीचा क्रम आहे, परंतु २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथे खेळल्या जाणाऱ्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात हा क्रम बदलणार आहे. पहिल्यांदाच खेळाडूंना लंचच्या आधीच टी ब्रेक मिळेल. देशाच्या पूर्व भागात सूर्योदय आणि सूर्यास्त लवकर होता, त्यामुळे हा निर्णय घेतला आहे.

गुवाहाटीच्या बरसापारा स्टेडियममध्ये खेळाचा पहिला सत्र सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत असेल. त्यानंतर ११ ते ११.२० वाजेपर्यंत टी ब्रेक दिला जाईल. दुसरे सत्र ११.२० ते दुपारी १.२० या वेळेत खेळले जाईल आणि मग १.२० ते २ वाजेपर्यंत लंच ब्रेक असेल. अखेरचे सत्र दुपारी २ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत पार पडेल. मैदानावर अतिरिक्त खेळण्यासाठी वेळ मिळावा यासाठी टी ब्रेकच्या सत्रात बदल करण्याचा निर्णय घेण्याची ही पहिलीच वेळ असेल.

गुवाहाटीत सूर्यास्त लवकर होतो, त्यामुळे सामना सकाळीच लवकर सुरू करावा लागतो. खेळाचा वेळ वाढवण्यासाठी लंचपूर्वी टी ब्रेक घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कसोटी सामन्यामध्ये दोन तासांचा खेळ होतो, त्यानंतर ४० मिनिटांचा लंच ब्रेक होतो. यानंतर पुन्हा दुसरे सत्र २ तासांचे असते. त्यानंतर २० मिनिटांचा टी ब्रेक होतो.

रणजी ट्रॉफीत आधीच झालेला प्रयोग

सामान्यतः भारतातील कसोटी सामने सकाळी ९.३० वाजता सुरू होतात. ४० मिनिटांचा लंच ब्रेक (११.३० ते १२.१०) आणि २० मिनिटांचा टी ब्रेक (२.१० ते २.३०) असा असतो. तिसरे सत्र २.३० ते ४.३० चालते. दिवसाला ९० षटके पूर्ण करण्यासाठी अर्धा तास अतिरिक्त वेळ दिला जाऊ शकतो.

याआधीही बीसीसीआयने रणजी ट्रॉफी सामन्यांमध्ये सूर्यास्ताच्या वेळेनुसार सत्रांचे वेळापत्रक बदलले आहे आणि आता तोच प्रयोग आंतरराष्ट्रीय कसोटीत पहिल्यांदाच होणार आहे.

## भारताचा विदित गुजराती बुद्धिबळ विश्वचषकातून बाहेर



पणजी : टाय-ब्रेक गेमच्या दुसर्या सेटमध्ये अमेरिकेच्या सॅम शँकलँडकडून २.५-३.५ असा पराभव पत्करावा लागल्याने भारतीय ग्रँडमास्टर विदित गुजराती बुद्धिबळ विश्वचषकाच्या तिसर्या फेरीतून बाहेर पडला. आणखी एक भारतीय खेळाडू एसएल नारायणनलाही टाय-ब्रेक गेमच्या पहिल्या सेटमध्ये चीनच्या यांगी यूकडून पराभव पत्करावा लागला. व्ही. कार्तिकने रोमानियाच्या डीक बोगदान-डॅनियलला १.५-०.५ असे पराभूत करून आपली धावपळ सुरू ठेवली. तो चौथ्या फेरीत पोहोचला. कार्तिक आता प्री-क्वार्टरफायनलमध्ये पोहोचण्यापासून फक्त एका विजयापासून दूर आहे.

विदित गुजराती हा स्पर्धेच्या पहिल्या तीन फेर्यांमध्ये बाहेर पडलेला तिसरा प्रमुख भारतीय खेळाडू आहे. त्याने विश्वविजेते डी. गुकेश आणि अरविंद चिथंबरम यांच्यानंतर स्थान मिळवले. गुकेशला जर्मनीच्या फ्रेडरिक स्वानने पराभूत केले, तर चिथंबरमला दुसर्या फेरीत कार्तिकने पराभूत केले. अर्जुन, प्रज्ञानंधा, हरिकृष्ण आणि प्रणव यांनी आधीच चौथी फेरी गाठली आहे.

## राहुल द्रविडच्या लेकाची भारताच्या यु१९ संघात निवड

**दिल्ली**-भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा लेकही वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत क्रिकेटमध्ये आपलं नशीब आजमावत आहे. अन्वय द्रविडही वडिलांप्रमाणेच फलंदाज आहे आणि याचबरोबर तो यष्टीरक्षक देखील आहे. यासह द्रविड यांचा मोठा मुलगा समित द्रविडदेखील फलंदाज आहे. यादरम्यान राहुल द्रविडचा मुलगा अन्वय याची भारतीय संघात निवड झाली आहे.द्रविडचा धाकटा मुलगा अन्वय आता भारतीय संघात खेळताना दिसणार आहे. भारतीय संघ अफगाणिस्तान ज्युनियर संघाबरोबर तिरंगी मालिका खेळणार आहे. ही तिरंगी मालिका खेळण्यासाठी बीसीसीआय भारताचे दोन अंडर-१९ संघ मैदानात उतरवले जाणार

## वर्ल्ड कप विनर खेळाडूच्या नावे स्टेडियम उभारणार: ममता बॅनर्जी

दिल्ली-भारताच्या महिला संघाने दोनच आठवड्यापुर्वी वर्ल्ड कप जिंकला होता.या विजयानंतर भारतीय खेळाडूंवर त्यांच्या त्यांच्या राज्यातील मुख्यमंर्त्यांनी देखील बक्षिसांचा वर्षाव केला होता.त्यात आता एका मुख्यमंर्त्यानी भारताच्या २२ वर्षीय स्टार खेळाडूच्या नावे स्टेडिअम उभारण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे या खेळाडूला आता मोठा मान मिळणार आहे.मुख्यमंर्त्याच्या या घोषणेने आता क्रिकेटपटूची एकच चर्चा रंगली आहे.

टीम इंडियाची २२ वर्षीय स्टार खेळाडू रिचा घोषने वर्ल्ड कप जिंकण्यात मोलाची भूमिका बजावली होती. या विजयानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रिचा घोषवर बक्षिसांचा वर्षाव केला होता.यानंतर आता मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सिलिगुडीमध्ये एक स्टेडियम बांधले जाईल, ज्याचे नाव विश्वचषक विजेती क्रिकेटपटू रिचा घोष यांच्या नावावर असेल,अशी मोठी घोषणा केली आहे.

उत्तर बंगालमधील सिलिगुडी हे २२ वर्षीय विकेटकीपर-फलंदाज घोष यांचे जन्मगाव आहे, ज्यांनी भारताच्या महिला विश्वचषक विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती.हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने २ नोव्हेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेला हरवून आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक जिंकला. आयसीसीने अंदाजे ४० कोटी रुपयांची बक्षीस रक्कम जाहीर केली, तर बीसीसीआयने ५१ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम जाहीर केली होता.



रिचा क्रिकेट स्टेडियम चांदमणी टी इस्टेटमधील २७ एकर जागेवर बांधले जाईल. बंगालमधील तेजस्वी क्रीडा प्रतिभा असलेल्या रिचाचा सन्मान करण्याचा आणि उत्तर बंगालमधील तरुण क्रिकेटपटूंना प्रोत्साहन देण्याचा हा एक मार्ग आहे,असे ममता बॅनर्जी यांनी सिलीगुडी येथे पत्रकारांना सांगितले.तसेच हा प्रकल्प लवकरच राज्य सरकार सुरू करेल,अशी माहिती त्यांनी दिली आहे.

दरम्यान रिचा घोष यांना शनिवारी पश्चिम बंगाल सरकारने 'बंग भूषण' पुरस्काराने सन्मानित केले, पोलिस उपअधीक्षक (डीएसपी) नियुक्त केले आणि सोन्याची साखळी दिली होती. तर रिचा घोषने महिला विश्वचषक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली, आठ सामन्यांमध्ये १३३.५२ च्या प्रभावी स्ट्राईक रेटने २३५ धावा केल्या, जो स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व फलंदाजांमध्ये सर्वाधिक आहे.

रिचा घोष या विश्वचषकात शतक हुकली, परंतु सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रमही तिच्या नावावर आहे. रिचाने महिला विश्वचषकात १२ षटकार मारले होते.

## मोहम्मद शमी भारतासाठी का खेळत नाही?- सौरवचा निवडसमितीला सवाल



**कोलकाता:**:मोहम्मद शमीची दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मालिकेसाठीही भारतीय संघात निवड झालेली नाही.

शमी भारतासाठी का खेळत नाहीये मला माहिती नाही अशा शब्दात भारताचे माजी कर्णधार सौरव गांगुली यांनी निवडसमितीवर टीका केली आहे. शमीने भारतासाठी शेवटची टेस्ट २०२३ मध्ये खेळला होता. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम मुकाबल्यात शमी खेळला होता. यंदाच्या वर्षी झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम लढतीत शमी खेळला होता. २ फेब्रुवारी रोजी झालेला टी२० सामना शमीचा या प्रकारातला शेवटचा होता.





भारतीय संघाच्या इंग्लंड दौऱ्यासाठी निवडसमितीने शमीच्या नावाचा विचार केला नाही. या दौऱ्यात मुख्य गोलंदाज जसप्रीत बुमराह ५ पैकी ३ टेस्ट खेळला. बुमराहच्या अनुपस्थितीत शमी टेस्ट खेळेल अशी अपेक्षा होती मात्र पूर्णपणे फिट नसल्यामुळे शमीची या दौऱ्यासाठी निवडच झाली नाही. मायदेशात वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेसाठीही त्याची निवड झाली नाही. काही दिवसात भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळणार आहे. मात्र या मालिकेसाठीही शमी संघात नाहीये. शमीची निवड न केल्याने गेल्या महिन्यातही सौरव गांगुलीने टीका केली होती.'शमी उत्तम गोलंदाजी करत आहे. फिट आहे. रणजी स्पर्धेत आपण त्याचा खेळ पाहतोच आहोत. त्याने त्याच्या खेळाच्या बळावर बंगालला जिंकून दिलं. निवडसमिती त्याचा खेळ पाहत असेल अशी आशा आहे. निवडसमिती आणि शमी यांच्यात संवाद होत असेल असंही वाटतं. फिटनेस आणि गुणकौशल्याचं म्हणाल तर हा जुना शमी आहे, ज्याला आपण ओळखतो. त्यामुळे तो भारतासाठी का खेळत नाहीये मला माहिती नाही. त्याने भारतासाठी टेस्ट, वनडे, टी२० अशा तिन्ही प्रकारात खेळायला हवं', असं गांगुली म्हणाले.भारत-दक्षिण आफ्रिका कोलकाता टेस्टच्या पार्श्वभूमीवर गांगुली पत्रकारांशी बोलत होते. शमी भारतासाठी न खेळण्याचं काही कारणच नाही असं ते म्हणाले. शमीने काही दिवसांपूर्वीच सुरू झालेल्या रणजी स्पर्धेच्या हंगामात बंगालकडून खेळताना १५ विकेट्स पटकावल्या आहेत.

# दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी प्रशासन कटिबध्द-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

## दिव्यांगांप्रती जाणीव जागृती जिल्हा कार्यशाळेत ४३० जणांचा सहभाग



**लातूर/प्रतिनिधी :** दिव्यांगांप्रती सन्मान आवश्यक आहे. दिव्यांगासाठी आता स्वतंत्र विभागाची स्थापना झाली असल्याने त्यांना मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ सुलभ होण्यास मदत झाली असून जिल्हा प्रशासन दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी मंगळवारी केले.

जिल्हा प्रशासन व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात झालेल्या दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृती जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, केंद्रीय सल्लागार मंडळाचे सदस्य सुरेश पाटील, जिल्हा न्यायालयाचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. श्रीराम देशपांडे, डॉ. राजेश पाटील, डॉ. योगेश निटुरकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे म्हणाल्या, ही कार्यशाळा जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी महत्वाची असून दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या संकल्पनेतून ही कार्यशाळा आयोजित केली आहे. या कार्यशाळेमुळे कायदेशीर अधिकार सर्वांना परिचित होवून जनजागृती होण्यास मदत होणार आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांनीही दिव्यांगाप्रती संवेदनशीलतेने काम करून आपली जबाबदारी पार पाडावी. दिव्यांगांसाठीच्या आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृती या कार्यशाळेतून सामाजिक व न्यायिक चर्चा होणार असून यामुळे मोठे बदल होतील. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ हा दिव्यांगांसाठी महत्वाचा असून यामुळे त्यांना समाजात सन्मानाची वागणूक मिळेल. प्रशासनही विविध योजनांच्या माध्यमातून दिव्यांगांना आधार देण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

प्रास्ताविकात जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी या कार्यशाळेच्या माध्यमातून दिव्यांगांच्या विविध कायद्यांची माहिती अधिकारी, कर्मचाऱ्यांना होईल असे सांगून विविध १० फॅक्टर, दिव्यांगांसाठी पार्किंग, रॅम्प, भरती प्रक्रिया व निधी खर्चाची माहिती दिली.

सूत्रसंचालन व्यंकट लामजने यांनी केले तर आभार वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता डॉ. राजु गायकवाड यांनी मानले. यशस्वीतेसाठी सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे, अण्णासाहेब कदम, जयश्री कुलकर्णी, नरसिंग बिरादार, विजय बुरांडे, शिवप्रसाद भंडारे, श्रीकृष्ण लाटे, गणेश पाटील, बालाजी बनसोडे, राजकुमार पवार, ज्ञानेश्वर राव, श्रीकांत उंबरे, गजानन बन, यांच्यासह जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयातील व दिव्यांग शाळांतील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेस जिल्हयातील विविध विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांसह दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती. या कार्यशाळेत जिल्हयातील ४३० जणांनी सहभाग नोंदविला.

मंगळवारी दिवसभर झालेल्या या कार्यशाळेत विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यात ॲड. श्रीराम देशपांडे यांनी दिव्यांग व्यक्तीचे हक्क, स्पेशल कोर्ट, सुरेश पाटील यांनी दिव्यांग व्यक्ती समाज व प्रशासन यांची दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनामधील भुमिका, डॉ. योगेश निटुरकर यांनी आरोग्य् व पुनर्वसन, सतीश भापकर यांनी शिक्षण व पुनर्वसन, सुरज बाजुळगे यांनी सुगम्यतेबाबत मार्गदर्शन केले. यासह व्यंकट लामजने यांनी सेवा सुविधा व जिल्हास्तरावरील विविध समिती रचना व त्यांची कार्ये, विठ्ठल गाडेकर यांनी दिव्यांगाच्या कौशल्य विकासाबाबतचे मार्गदर्शन तर दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी विविध विभागाच्या रोजगार व नोकरी आरक्षण, निधीचा विनियोग याविषयी माहिती दिली.

## जळकोट येथे जे. एस. डब्ल्यू. संजीवनी हॉस्पिटल व फाउंडेशनच्या वतीने मोफत आरोग्य शिबिर



**जळकोट/विजय पिसे :** तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे जे. एस. डब्ल्यू. एनर्जी आणि जे. एस. डब्ल्यू . फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने आणि सरपंच गजेंद्र कदम यांच्या पुढाकाराने मोफत आरोग्य शिबिराचे दिनांक ११ नोव्हेंबर वार मंगळवार रोजी सकाळी ८.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराची सुरुवात गावचे माजी सरपंच अशोक भाऊ कदम यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले . यावेळी सरपंच गजेंद्र कदम, ग्रामपंचायत सदस्य महेश कदम, अनिल छत्रे, बसवराज कवठे, कृष्णात मोरे, चंद्रकांत स्वामी, नितीन माळी, राजकुमार कारले, अमोल आलुरे, शंकर कदम आदी मान्यवर उपस्थित होते.या शिबिरामध्ये बीपी, शुगर, सामान्य आरोग्य, व डोळे तपासणी सोबतच मोफत चष्मे नोंदणी, सर्दी, ताप, घसा, खोकला व तसेच ६९ किशोरवनीय मुली आणि महिलांना आरोग्य मार्गदर्शन अशा सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. त्याचबरोबर सोबतच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पात्र लोकांना मोफत औषधे व १२९ चष्म्याचे ही वाटप करण्यात आले. या शिबिरामध्ये जे. एस. डब्ल्यू. संजीवनी मल्टी हॉस्पिटल जेलवी रायगड यांच्या तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने २५२ ग्रामस्थांना विविध आरोग्य सेवा दिल्या. यामध्ये डॉ. सागर यादव, डॉ. स्मिता पाटील, चिंत्राम पाटील, राहुल पाटील, विनीत पाटील, राहुल म्हात्रे, सागर पाटील, सचिन सर, यांच्या टीमचे सहकार्य लाभले. ग्रामस्थांनी सदर शिबिरा बाबत आणि मिळालेल्या शेगाव आणि उपचाराबाबत समाधान व्यक्त केले.

# विलास सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** विलास सहकारी साखर कारखाना लिमिटेड, वैशालीनगर, निवळी येथील गळीत हंगाम सन २०२५-२६ चा शुभारंभ मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता करण्यात आला. कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते आणि सर्व संचालकांच्या उपस्थितीत गव्हाणीत उसाची मोळी टाकून या हंगामाचा विधिवत शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी गव्हान पूजनही करण्यात आले.

पूर्ण क्षमतेने गाळप करण्याचे निर्देश

विलास कारखाना कार्यक्षेत्रात गळीत हंगामासाठी ऊसाची मोठ्या प्रमाणात उपलब्धता आहे. त्यामुळे ऊसाचे वेळेवर गाळप होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर कारखान्याचे संस्थापक चेअरमन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, मुख्य प्रतोद विधीमंडळ काँग्रेस, महाराष्ट्र विधानसभा, आमदार अमित विलासराव देशमुख आणि



चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी गळीत हंगाम पूर्ण क्षमतेने सुरू करण्याच्या तसेच गळीत हंगामात उच्चांकी गाळप व उच्चांकी उतारा राखण्याच्या सूचना दिल्या आहेत. गत गळीत हंगामाप्रमाणेच हा हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व नियोजन करण्यात आले आहे.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेतून उभा राहिलेला विलास सहकारी साखर कारखाना माजी मंत्री आदरणीय दिलीपराव देशमुख यांच्या कुशल नियोजनानुसार, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, माजी आमदार धीरज विलासराव देशमुख आणि कारखान्याचे अध्यक्षा वैशालीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल करत आहे. प्रारंभी गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगीची सत्यनारायण पुजा संचालक शाम बरुरे व सौ. पुनम बरुरे यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., चे व्हा.चेअरमन अशोक काळे, माजी चेअरमन धनंजय देशमुख, डॉ.सारीका देशमुख, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांच्यासह संचालक सर्वश्री रवींद्र काळे, अमृत जाधव, सतिष शिंदे (पाटील), अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, रसुल पटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने, संचालक दयानंद बिडवे तसेच माजी संचालक भैरवनाथ सवासे व ऊस उत्पादक सभासद तसेच सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख व कर्मचारी आदी मोठया संख्येने उपस्थित होते.

## नांदगावच्या दत्तनगरीत दत्त जन्मोत्सवानिमित्त गुरुचरित्र पारायण व सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या नांदगाव येथील दत्त नगरीत दत्त जन्मोत्सवानिमित्त दि. २६ नोव्हेंबर ते दि. ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत श्री गुरुचरित्र पारायण, श्रीमद् याग व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दत्त मंदिराचे संस्थापक गुरुवर्य गुलाबगिरी महाराज यांनी ही माहिती दिली.

या सोहळ्यानिमित्त दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी श्री दत्त पालखी सोहळा व नगर प्रदक्षिणा होणार आहे. सोहळ्याचे श्रीगणेश पूजन सागर सुरेश कारंजे यांच्या हस्ते, दीप पूजन विजय पस्तापुरे , बसवराजप्पा वळसंगे, वीणा पूजन रमाकांत कोटीवाले, राजेश्वर बुके, ग्रंथ पूजन हरिदास गिरी, गाथा पूजन भरत गिरी यांच्या हस्ते होणार आहे.सप्ताहात हभप. गोपाळदेव जोशी महाराज ढाळेगावकर, हभप. लीलाताई शिंदे भिंगोलीकर , हभप. भाग्यश्रीताई भरत गिरी, हभप. वामन महाराज मुरंबीकर, हभप. शरदचंद्र महाराज बिराजदार, हभप. प्रशांत महाराज खानापूरकर, हभप. विनोदाचार्य महाराज गेजगे यांची किर्तन सेवा होणारआहे. सप्ताहात नांदगाव, लातूर, ढाळेगाव येथील विविध भजनी मंडळी सहभागी होणार आहेत. गुरुवार, दि. ४ डिसेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता श्री जन्मोत्सव होईल. त्यानिमित्त हभप. भागवताचार्य महाराज पालमकर यांचे गुलाल काल्याचे किर्तन होणार आहे. या सोहळ्यास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन संस्थापक गुरुवर्य गुलाबगिरी महाराज, अशोक चांडक, नितीन क्षीरसागर, प्रशांत पटणे , रामेश्वर भराडिया, बसवराज वळसंगे, अक्षय केंद्रे, सुमंत कवळीकर , हरीश सुरेश गिरी, गोविंद सोनवळे, रोहित पाटील, मनोज वाघमारे, रामलिंग अंकलकोटे, धीरज तिवारी, माधव ढमाले आदी मान्यवरांनी केले आहे.

## तिरुपतीत राबविले 'खिळेमुक्त झाडे' अभियान, लातूरच्या वसुंधरा प्रतिष्ठानचा पर्यावरणपूरक पुढाकार



**लातूर/प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धन आणि झाडांचे रक्षण हा वसुंधरा प्रतिष्ठानचा नेहमीच प्रमुख ध्यास राहिला आहे. त्याच ध्यासातून लातूरच्या वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे आंध्र प्रदेशातील तिरुपती शहरात 'खिळेमुक्त झाडं अभियान' राबविण्यात आले. या उपक्रमात शहरातील प्रमुख मार्गांवरील झाडांवरील खिळे, जाहिरातीचे फलक व पोस्टर्स काढून झाडांना मुक्त श्वास घेण्याची संधी देण्यात आली.




व्यवसायाच्या व इतर जाहिरातीचे फलक लावण्यासाठी झाडांना खिळे मारले जातात. झाडांना खिळे मारल्याने झाडांना वेदना होतात, झाडांची वाढ देखील खुंटते. यासाठी लातूर येथील वसुंधरा प्रतिष्ठान खिळेमुक्त झाडं अभियान राबवून झाडांना मारलेले खिळे काढण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे करत आहे. मात्र, परत परत झाडांना खिळे मारले जातात. प्रतिष्ठानचे पदाधिकारी तिरुपती बालाजी येथे दर्शनासाठी गेले असता तिथे झाडांना खिळे मारलेले त्यांना दिसले. तिथेही प्रतिष्ठानने खिळेमुक्त झाडं अभियान राबविले. या अभियानात वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. योगेश शर्मा, अध्यक्ष डॉ. अजित चिखलीकर, कार्याध्यक्ष अमोल आप्पा स्वामी, सदस्य सुग्रीव कांबळे, दीपक धायगुडे, एकनाथ शेळके यांनी सहभागी होत झाडांना मारलेले खिळे काढले.

स्थानिकांमध्ये जनजागृती व्हावी, हाच उद्देश : प्रा. योगेश शर्मा

प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. योगेश शर्मा यांनी सांगितले की, झाडांच्या खोडांवर ठोकले जाणारे खिळे त्यांना जखमी करतात आणि त्यांच्या वाढीस अडथळा निर्माण करतात. प्रत्येक नागरिकाने 'एक झाड-शून्य खिळा' हे ब्रीद आत्मसात करणे गरजेचे आहे. वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे गेल्या अनेक वर्षांपासून खिळेमुक्त झाडं अभियान राबविण्यात येते. तिरुपतीला गेलो असता तिथे झाडांना खिळे आढळून आले. तेथील स्थानिकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी तिथे खिळेमुक्त झाडं अभियान राबविले. झाडेही सजीव आहेत त्यांना खिळे मारू नये.

# बिंदगीहाळच्या सरपंच, उपसरपंच यांच्यासह अनेकांचा आ. कराड यांच्या उपस्थितीत भाजपात जाहीर प्रवेश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत होत असलेल्या विविध विकास कामांना प्रेरित होऊन लातूर तालुक्यातील मौजे बिंदगीहाळ येथील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरपंच पूनम कांबळे, उपसरपंच सूर्यकांत शिंदे यांच्यासह शेकडो जणांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भाजपाचे नेते रमेशआप्पा कराड यांना विजयी करून मतदारांनी नवा इतिहास घडविला. तेव्हापासून संपूर्ण मतदार संघातील गावागावात शासनाच्या विविध विभागामार्फत मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाल्याने अनेक विकास कामाना गती मिळाली. होत असलेल्या विविध कामांना प्रेरित होऊन अनेक जण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश करीत आहेत.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात मंगळवारी लातूर तालुक्यातील मौजे बिंदगीहाळ येथील सरपंच, उपसरपंच यांच्यासह शेकडोजनांनी भाजपामध्ये जाहीर प्रवेश केला यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला असून या प्रवेशामुळे येणाऱ्या काळात होणाऱ्या भातांगळी जिल्हा परिषद आणि बोरी पंचायत समिती निवडणुकीत भाजपाचे बळ वाढण्यास मोठी मदत होणार आहे. भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत लातूर तालुक्यातील मौजे बिंदगीहाळ येथील प्रवेश प्रसंगी भाजपाचे मंडलाध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, विजयकुमार मलवाड, सुरेश पाटील, महादेव साळुंके, पांडुरंग बालवाड, हनुमंत गव्हाणे, आदिनाथ मुळे, मारुती शिंदे, सचिन साबदे, संजय सावंत, तुकाराम शिंदे, राम शेंडगे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बिंदगीहाळ येथील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरपंच पुनम बाळू कांबळे, उपसरपंच सूर्यकांत शिंदे ग्राम सदस्य कमल सावंत, ओया मांजरे, माजी व्हा. चेअरमन भाऊसाहेब शिंदे, विठ्ठलराव सावंत, सत्यभामा शिंदे, जनाबाई शिंदे, कानिकबाई टेकाळे, कालींदाबाई शिंदे, सुभद्राबाई सावंत, पुष्पाबाई सावंत, अशांतबाई सूर्यवंशी, केवळबाई सावंत, सुभद्रा काळे, वर्षा शिंदे, गणेश कांबळे, अरविंद सुरवसे, ताजुद्दीन शेख, शफी शेख, राजकुमार शिंदे, गोविंद सूर्यवंशी, रामेश्वर सावंत, दत्तू चित्ते,




लिंबराज शेंडगे, बलभीम शेंडगे, प्रल्हाद सूर्यवंशी, गोविंद काळे, प्रताप सावंत, सुभाष सावंत, बबन शेंडगे, सोपान सूर्यवंशी, बालाजी सावंत, सुदर्शन सावंत, ज्ञानोबा सूर्यवंशी, गणपत शिंदे निवृत्ती सूर्यवंशी यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला. यावेळी बोलताना आ. कराड यांनी भारतीय जनता पार्टीत सर्वांचे स्वागत करून प्रत्येकाला मान सन्मान दिला जाईल. बिंदगीहाळ गावच्या विकासासाठी येत्या काळात निश्चितपणे विविध योजना राबवण्यासाठी निधी मिळवून देऊ अशी ग्वाही दिली.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात अध्यापक विकास कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर आणि डॉ. हरिसिंह गौर केंद्रीय विद्यापीठ, सागर (मध्यप्रदेश) अंतर्गत कार्यरत यूजीसी-मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (एनईपी २०२०) अंतर्गत ओरिएंटेशन आणि जागरूकता कार्यक्रमाचे उद्घाटन सत्र गुरुवार, ६ नोव्हेंबर २०२५ रोजी वाजता ऑनलाइन पद्धतीने पार पडले. सदरील प्रोग्राम १७ नोव्हेंबर पर्यंत चालणार आहे. या उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान कुलगुरू प्रतिनिधी प्रा. डॉ. दिवाकर शुक्ला, डॉ. हरिसिंह गौर केंद्रीय विद्यापीठ, सागर (म.प्र.) यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे संयुक्त सचिव श्री विशाल लाहोटी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वागतपर भाषण प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी केले. संयोजक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बी.टी. चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करून आयोजनामागील भूमिका विषद केली. कार्यक्रमाच्या शेवटी यूजीसी-मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. आर.टी. बेदरे यांनी आभार प्रदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने यांचीही यावेळी उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आकांक्षा भांजी यांनी कुशलतेने केले. या ऑनलाइन सत्रामध्ये देशभरातील विविध विद्यापीठांतील आणि महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# १६ शिवभोजन केंद्रचालकांचे ५ महिन्यांपासूनचे ७० लाख थकले

धाराशिव (प्रतिनिधी)-गरिबांना एकवेळचे जेवण मिळावे, यासाठी राज्य शासनाने शिवभोजन केंद्र कार्यान्वित केलेले आहेत. मात्र, या केंद्र चालकांना आता वेतच वेळेवर मिळत नसल्याने केंद्रही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. २२ पैकी केवळ १६ केंद्र सध्या सुरू आहेत. या केंद्र चालकांचे मागील पाच महिन्यांपासून ७० लाख रुपये थकले आहेत. राज्यात पाच वर्षांपूर्वी शिवभोजन केंद्र सुरू करण्यात आली. जिल्ह्यात या केंद्राची संख्या २२ वर पोहोचली होती. प्रारंभी जिल्हास्तरावर सुरू असलेले केंद्र तालुका व पालिका क्षेत्रातही सुरू झाले होते. या केंद्रामुळे गरजू व गरीब व्यक्तींच्या एकवेळेच्या जेवणाची भ्रांत मिटत होती. मात्र, या केंद्राचा निधीच आता वेळेवर मिळत नाही. जून महिन्यापासून रक्कम केंद्र चालकांना मिळालेली नाही. अनुदान वेळेवर मिळत नसल्याने केंद्रचालकांना सोने गहाण ठेवून व ऊसनवारीवर केंद्र चालवावे लागत आहेत. आर्थिक अडचणीमुळे मागील काही वर्षात सहा केंद्रांना कुलूप लागले आहे. आता सुरू असलेल्या केंद्रांना वेळेवर रक्कम न मिळाल्यासही केंद्रही बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गरजू व्यक्तींना फटका बसू शकतो.

शिवभोजन केंद्रांना पूर्वी एक ते दोन महिन्यातच राज्य शासनाकडून अनुदान मिळत होते. जून महिन्यापासून गोल्ड लोन घेऊन केंद्र चालवत आहे. माझ्या केंद्राचे पाच लाखाचे अनुदान थकीत आहे. तसेच माझ्याशिवाय अनेक केंद्रचालकांचे लाखो रुपयांची अनुदान थकित आहे. सचिन मोरे, शिव भोजन केंद्र चालक लोकांची गैरसोय, योजनेला घरघर राज्यात पाच वर्षांपूर्वी शिवभोजन केंद्राची सुरूवात करण्यात आली. या योजनेचे अनुदान वेळेवर मिळत नसल्याने केंद्र चालविणाऱ्यांना त्रास होत आहे. २०२५ मध्ये चर्चा अशी आहे की, यो जनेचा पुढील बजेटमध्ये उल्लेख नसल्यामुळे ते बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे केंद्रचालकांना आर्थिक फटका बसेल का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यात लोकांची गैरसोय होत आहे.

# विद्यापीठ उपपरिसरात वंदे मातरम् सार्ध शताब्दीनिमित्त रांगोळी, निबंध स्पर्धा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन, सर्व विजेत्यांचा केला गौरव



धाराशिव (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसरामध्ये संचालक प्रा. डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी रांगोळी, निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण केले.

सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ उपपरिसरातील विविध विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत उपपरिसरातील विविध विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचा मुख्य भाग म्हणून उपपरिसरातील सभागृहात वंदे मातरम सार्ध शताब्दीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करण्यात आली. उपपरिसरातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांनी मिळुन वंदेमातरम या गीताचे सामुदायिक गायन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. विक्रम शिंदे यांनी प्रास्ताविक केले व विविध स्पर्धेसंदर्भात विस्तृत माहिती दिली. त्याचबरोबर ७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जातो, त्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. जितेंद्र शिंदे यांनी वंदे मातरम या गीताचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महत्व सांगितले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. शिंदे यांनी राष्ट्रगीत व राष्ट्रीय गीत या दोन्हीत नेमका फरक, वंदे मातरम या गीताचा अर्थ, वंदे मातरम या गीताने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील किती महत्वपूर्ण योगदान दिले, याबद्दल सांगितले. रांगोळीत स्मिता तर निंबध स्पर्धेत प्रतीक्षा प्रथम रांगोळी स्पर्धेत स्मिता पाटील (भौतिकशास्त्र विभाग) यांनी प्रथम क्रमांक मिळवला, ऐश्वर्या केवळे द्वितीय क्रमांक, प्रतीक्षा अवताडे यांना तृतीय क्रमांक मिळाला. या सर्व विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढा या विषयावर रांगोळी काढली होती. निबंध स्पर्धेत एकुण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. निबंध स्पर्धेत अवताडे हिला प्रथम क्रमांक मिळाला. प्रतिक्षा ढगेला दुसरा व पाटील यांना तिसरा क्रमांक मिळाला.

# लातूर - पुणे महामार्गावर ढोकी येथे ट्रॉमा केअर युनिट सुरू करा




धाराशिव (प्रतिनिधी)- लातूर - बार्शी - पुणे महामार्गावरील ढोकी येथे ट्रॉमा केअर युनिट सुरू करण्यात यावे अशी मागणी शिवसेनेचे राज्य आंदोलन समन्वयक अ‍ॅड. तुकाराम शिंदे यांनी पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे केली आहे.

त्याचबरोबर राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनाही निवेदन देऊन मागणीकडे लक्ष वेधले. दोन्ही मंत्री महोदयांनी ट्रॉमा केअर युनिटबाबत सकारात्मक भूमिका घेतली असल्याची माहिती अ‍ॅड. तुकाराम शिंदे यांनी दिली.

मुंबई येथे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक व राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन मागणीचे निवेदन ड. तुकाराम शिंदे यांनी मंगळवारी (दि.११) सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की, लातूर - बार्शी - पुणे ते मुंबई महामार्गावरील १५ ते १६ गावाचा संपर्क असणारे आणि हायवेलगत असलेले ढोकी गाव साखर कारखाना व गाव ही महत्त्वाची वर्दळीची ठिकाणे आहेत. दररोज हजारो लोक या मार्गावरून विविध वाहनांतून ये-जा करतात. दिवसेंदिवस वाहनांची व प्रवाशांची संख्या वाढत असल्याने अपघातांची व त्यातील जखमी रुग्णांची संख्या वरचेवर वाढत आहे. त्यामुळे अपघातग्रस्त व जखमी रूग्णांना तात्काळ योग्य ते उपचार वेळेवर मिळण्यासाठी ढोकी येथे अस्थिरोगतज्ञासह ट्रॉमा केअर युनिटची म्हणजेच अपघात विशेषोपचार केंद्राची नितांत आवश्यकता आहे. सध्या विशेष बाब म्हणून ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे.

आता ढोकी पीएचसीच्या जागी विशेष बाब म्हणून तात्काळ ट्रॉमा केअर युनिट मंजूर करण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना आदेशीत करावे, असे निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे.

# उमरगा पोलिसांनी केली दोन लाख रुपयांची दारू जप्त



उमरगा,(प्रतिनिधी)- तालुक्यातील पळसगाव तांडा तलावालगत सुरू असलेल्या दोन गावठी दारूच्या अड्ड्यावर शनिवारी, (दि ०८) सकाळी सात ते साडे आठच्या सुमारास पोलिसांनी छापा टाकला. छाप्यात सुमारे २ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त करीत अड्डे उध्वस्त केले.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, पळसगाव तांडा येथे तलावालगत गावठी दारूचे अड्डे सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसाना मिळाली. यानुसार पोलिस उप अधीक्षक सदाशिव शेलार व पोलिस निरीक्षक प्रल्हाद सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईचे नियोजन करण्यात आले. शनिवारी सकाळी पोलिस उपनिरीक्षक गजानन पुजरवाड, पांडुरंग कन्हेरे, पोहेकॉ अतुल जाधव, अनुरूद्र कावळे, नवनाथ भोरे, श्रीकांत चौधरी, बाबा कांबळे आदि पोलिस कर्मचाऱ्यांनी रोडवर वाहने उभी केली. गावठी दारू अड्ड्यावर धाड टाकली.

या धाडीत ३ हजार लिटर गुळ मिश्रीत रसायन, १२० हातभट्टी दारू व साहित्यासह १ लाख ३२ हजाराचा तर जवळच असलेल्या दुसऱ्या दारूच्या अड्ड्यावरील धाडीत २ हजार २०० लिटर गुळ मिश्रीत रसायन, १२० लिटर हातभट्टी दारू व साहित्यासह १ लाख ३ हजार रुपये असा दोन्ही छाप्यातील मिळून २ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त करीत जागेवर नष्ट केला. दरम्यान पोलिसांचे पथक येत असल्याचा सुगावा लागताच जयचंद लक्ष्मण राठोड व संजय उमाजी राठोड हे झाडा झुडपांचा फायदा घेत घटना स्थळावरून प्रसार झाले. या प्रकरणी पोलिस नाईक बाबासाहेब कांबळे व पोहेकॉ श्रीमंत चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उमरगा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# जकेकूर चौरस्त्यावरील लॉजवर वेश्याव्यवसाय! पोलिसांचा छापा

उमरगा,(प्रतिनिधी)-उमरगा तालुक्यातील जकेकूर चौरस्ता ते लातूर जाणाऱ्या रस्त्यालगतच्या एका लॉजवर सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर पोलिसांनी छापा मारला आहे. याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, पश्चिम बंगाल येथील एका महिलेची सुटका करण्यात आली आहे. ही कारवाई रविवार, दिनांक ९ रोजी रात्री साडे अकराच्या सुमारास करण्यात आली. प्रीतीश (वय २६, रा. गुंजोटी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यातील जकेकूर चौरस्ता येथील हॉटेल सागर बार अँड लॉजचा चालक आणि व्यवस्थापक (मॅनेजर) प्रीतीश (वय २६, रा. गुंजोटी, ता. उमरगा) हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लॉजच्या वरच्या मजल्यावर वेश्या व्यवसाय चालवत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी यांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे, पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी यांनी तातडीने कारवाईचे नियोजन केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराटे, पोलीस उपनिरीक्षक गजानन पुजरवाड, पांडुरंग कन्हेरे, रामहरी चाटे, पोहेका अतुल जाधव, अनुरुद्र कावळे, पोलीस नाईक नवनाथ भोरे आदी पोलीस कर्मचाऱ्यांचे एक विशेष पथक यासाठी स्थापन करण्यात आले.

# धाराशिव तालुक्यात रब्बी पेरणीला सुरुवात; शेतकऱ्यांची चिंता कायम



धाराशिव तालुक्यात खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्यांनी रब्बी हंगामाकडून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा ठेवली होती. परंतु सतत सुरू असलेल्या परतीच्या पावसामुळे पेरणीला विलंब झाला असून, सध्या तालुक्यात सुमारे ४० टक्के पेरणी झाल्याचे चित्र आहे.

मागील काही दिवसांपासून पाऊस थांबल्याने आणि थंडीची चाहूल लागल्याने जमिनीचा वापसा होऊ लागला असून, अनेक ठिकाणी रब्बी पिकांच्या पेरणीला सुरुवात झाली आहे. तडवळे परिसरासह काही गावांमध्ये शेतकरी पेरणीसाठी शेतात उतरलेले दिसत आहेत.

दरम्यान, सततच्या पावसामुळे काही ठिकाणी आधीच पेरणी झालेल्या क्षेत्रात पाणी साचल्याने बीज कुजणे, अंकुर न येणे, रोपे मरून जाणे अशा समस्या दिसू लागल्या आहेत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणीचा सामना करावा लागत आहे. हवामान खात्याने डिसेंबरपर्यंत पावसाचा अंदाज वर्तविल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

खरिपातील अतिवृष्टी आणि रब्बीतील विलंबित पेरणीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे. रब्बी ही जाते का धावून? असा सवाल सध्या धाराशिव तालुक्यातील शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

# मोटरसायकलची चोरी:गुन्हा दाखल

उमरगा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-अक्षय महादेव गायकवाड, वय २५ वर्षे, रा. कदेर ता. उमरगा जि. धाराशिव यांची अंदाजे १,१३,००० किंमतीची होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटरसायकल क्र एमएच २५ बी.ई. ०४५५ काळ्या रंगाची ही दि.०६.११.२०२५ रोजी ०४.०० वा. सु. ते दि. ०६.११.२०२५ रोजी ०६.०० वा. सु. कदेर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अक्षय गायकवाड यांनी दि.१०.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# जुगार विरोधी कारवाई

तामलवाडी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान तामलवाडी पोलीसांनी दि.०५.११.२०२५ रोजी तामलवाडी पो ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापे टाकले. यावेळी रा.जळकोट ह.मु. तामलवाडी येथे मुंबई मटका जुगाराचे साहित्या एकुण ६०० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले तामलवाडी पो. ठाणेच्या पथकास आढळले.

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649